दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–६१ | मंगळवार दि.११ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मोदींनी नेहरूंची बरोबरी साधली

लोकसभा निवडणुकीत मतदारांनी दिलेला नवा जनादेश शिरसावंद्य मानून नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेत आपले ७२ मंत्र्यांचे जम्बो मंत्रिमंडळ रविवारी जाहीर केले. मोदी यांनी सलग ३ वेळा पंतप्रधान झालेले देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची बरोबरी साधली. मोदी यांच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारमध्ये ३० कॅबिनेट, ५ राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि ३६ राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळात सर्वाधिक ११ मंत्री उत्तर प्रदेशचे तर महाराष्ट्राचे ६ मंत्री आहेत. ज्या तेलगू देसम आणि जदयुच्या पाठिंब्यावर हे सरकार विसंबून आहे त्यांना प्रत्येकी २ केंद्रीय मंत्रिपदे देण्यात आली आहेत.

### पेरणीसाठी घाई करू नका; परभणी कृषी विद्यापीठाचा शेतकऱ्यांना सल्ला

परभणी : मान्सूनच्या आगनामुळे शेतकरी शेतीच्या तयारीला लागला आहे. लवकरच पेरणी सुरु करण्याच्या तयारीत आहे. दरम्यान, शेतक–यांनी पेरणीसाठी घाई करू नये, असे परभणीच्या विद्यापीठातील कृषी विभागाने शेतक–यांना पेरणीसंदर्भात आवाहन केले आहे. प्रत्येक ठिकाणी ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय शेतक–यांनी पेरण्या करू नयेत, असे आवाहन परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांनी केला आहे. परभणी कृषी मौसम आणि हवामान विभाग आणि वनामकृवी विभाग प्रमुख डॉ. कैलास डाखोरे यांनी शेतक–यांना हा सल्ला दिला आहे.

# किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता जारी

## पंतप्रधान मोदींचा शपथ घेतल्यानंतर पहिला मोठा निर्णय

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**मोदी सरकारचा पहिला निर्णय देशातील करोडो शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून घेण्यात आला आहे. तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोमवारी पीएम किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता जारी केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत मोदी यांनी काल पंतप्रधान म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ घेतल्यानंतर आज नवी दिल्लीत पंतप्रधानपदाचा कार्यभार स्वीकारला. यानंतर त्यांनी या निर्णयावर स्वाक्षरी केली.**

९.३ कोटी शेतकऱ्यांना होणार लाभ

पंतप्रधान म्हणून शपथ घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी पहिला मोठा निर्णय घेतला आहे. पीएम किसान निधीच्या १७ व्या हप्त्याचे प्रकाशन अधिकृत करणाऱ्या फाइलवर त्यांनी स्वाक्षरी केली. याचा ९.३ कोटी शेतकऱ्यांना लाभ होणार असून २० हजार कोटी रुपयांचे वितरण होईल. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, आम्ही शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध आहोत. कृषी क्षेत्रासाठी अधिक काम करत राहू. यापूर्वी,



पंतप्रधान किसान योजनेअंतर्गत, १६ व्या हप्त्याचे पैसे २८ फेब्रुवारी रोजी देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पाठवले गेले होते. देशातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी केंद्र सरकार पीएम किसान सन्मान निधी योजना राबवत आहे. तथापि, पीएम किसान सन्मान योजनेंतर्गत, ही रक्कम एकरकमी नाही तर २ हजार रुपयांच्या तीन समान हप्त्यांमध्ये शेतकऱ्यांच्या बँक ◀◀ पान २ वर



### शेतकऱ्यांच्या दु:खाची जान असलेला मिळाला कृषी मंत्री

मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे कृषी आणि शेतकरी कल्याण आणि पंचायत आणि ग्रामीण विकास मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली आहे. शिवराज सिंह चौहान हे शेतकऱ्यांच्या दु:खाची जान असणारे नेतृत्व आहे. मध्ये प्रदेशचे मुख्यमंत्री असतांना शेतकऱ्यांसाठी त्यांनी मोठे काम केलेले आहे. त्यामुळे देशाच्या कृषी खात्याची जबाबदारी योग्य व्यक्तीच्या हाती आली असे म्हटले जात आहे.

## सव्वातीन लाख टन संत्र्यावर करणार प्रक्रिया

**अमरावती । प्रतिनिधी**

**अमरावती जिल्ह्यात ७९,२१३ हेक्टरवर संत्रा असून हंगामी उत्पादकता सहा लाख ७३ हजार ५२० टन आहे. त्या पार्श्वभूमीवर पूर्वीचे ३३ व नव्याने प्रस्तावित १२ याप्रमाणे ४५ प्रकल्पांच्या माध्यमातून ५० टक्के फळांवर प्रक्रिया करणे याद्वारे शक्य होईल, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी दिली.**



प्रस्तावित शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून प्रकल्प आराखडा सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये, हार्टिगो शेतकरी उत्पादक कंपनी (कविठा बु., अचलपूर) प्रकल्पाची किंमत २३९.२१ लाख रुपये आहे. श्रमजीवी नागपुरी संत्रा उत्पादक कंपनीचा (वरुड) प्रकल्प आराखडा ३३१.७३ लाख रुपयांचा आहे. कृषी प्रेन्यूवर कंपनी (हिवरखेड, मोर्शी) या कंपनीचा प्रकल्प ३६२.६९ लाख रुपयांचा आहे. ऑरेंजव्हिले (वरुड) या कंपनीने ३७४.३ लाख रुपयांचा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू केले आहे. कृष्णार्पण शेतकरी कंपनी (अंबाडा, मोर्शी) या कंपनीचा प्रकल्प २५२.४ लाखांचा आहे. समृद्धा ॲग्रोटेक कंपनी (वलगाव)द्वारे ४६६.९४ लाख, गजलक्ष्मी ॲग्रो कंपनी (चौसाळा, अंजनगाव)द्वारे २५६.१७, जिजाऊ कल्टिव्हेटर कंपनी ◀◀ पान २ वर

# महाराष्ट्रातील दोन्ही कॅबिनेट मंत्र्याकडे महत्वाचे खाते

## गडकरींकडील जुनं खातं कायम, पीयूष गोयल यांच्याकडे वाणिज्य आणि उद्योग मंत्री








**रामदास आठवले**
सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री.,

**रक्षा खडसे**
युवा कार्य आणि क्रीडा राज्यमंत्री.,

**मुरलीधर मोहोळ,**
सहकार राज्यमंत्री आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री.,

**प्रतापराव जाधव**
आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि आरोग्य तथा कुटुंब कल्याण राज्यमंत्री.,

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेत देशाचा कारभार हाती घेतला आहे. दरम्यान, शपथविधी सोहळ्यानंतर आज नव्या मंत्रिमंडळाची पहिलीच बैठक चालू झाली आहे. या बैठकीत खातेवाटपदेखील करण्यात आलं आहे. मोदींच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात जुन्या काही नेत्यांकडील खाती कायम ठेवण्यात आली आहेत. जसे की, अमित शाह यांच्याकडील गृह विभाग, राजनाथ सिंह (संरक्षण), निर्मला सीतारामण (अर्थ), एस. जयशंकर (परराष्ट्र) आणि नितीन गडकरी यांच्याकडील रस्ते वाहतूक तथा महामार्ग मंत्रालय कायम ठेवण्यात आलं आहे.तर पीयूष गोयल यांच्याकडे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पद सोपवण्यात आले तर भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याकडे आरोग्य मंत्रालय सोपवण्यात आलं आहे. दरम्यान, मध्य प्रदेशचं ◀◀ पान २ वर

### कॅबिनेट मंत्र्यांना कुठले खाते

राजनाथ सिंह संरक्षण मंत्रा, अमित शाह गृहमंत्री; सहकार मंत्री, नितीन गडकरी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री, जगत प्रकाश नड्डा आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री; रसायने आणि खते मंत्री, शिवराज सिंह चौहान कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री आणि ग्रामविकास मंत्री, निर्मला सीतारामण अर्थमंत्री आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री., डॉ. सुब्रह्मण्यम जयशंकर परराष्ट्र व्यवहार मंत्री, मनोहर लाल खट्टर गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री आणि उर्जा मंत्री., एच. डी. कुमारस्वामी अवजड उद्योग मंत्री आणि पोलाद मंत्री, पीयूष गोयल वाणिज्य आणि उद्योग मंत्री, धर्मेंद्र प्रधान शिक्षण मंत्री, जीतन राम मांझी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री, राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह पंचायत राज मंत्री आणि मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री, सर्वानंद सोनोवाल बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री., वीरेंद्र कुमार सामाजिक न्याय मंत्री, के. आर. नायडू नागरी विमान वाहतूक मंत्री, प्रल्हाद जोशी ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री, जुआल ओरम आदिवासी व्यवहार मंत्री, गिरीराज सिंह वस्त्रोद्योग मंत्री, अश्विनी वैष्णव रेल्वेमंत्री, माहिती आणि प्रसारण मंत्री, आणि इलेक्ट्रॉनिक्स तथा माहिती तंत्रज्ञान मंत्री, ज्योतिरादित्य सिंधिया दळणवळण मंत्री, ईशान्य क्षेत्राचे विकास मंत्री, भूपेंद्र यादव पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री, गजेंद्रसिंह शेखावत सांस्कृतिक कार्य मंत्री आणि पर्यटन मंत्री, अन्नपूर्णा देवी महिला आणि बाल विकास मंत्री, किरेन रिजिजू संसदीय कामकाज मंत्री, अल्पसंख्याक व्यवहार मंत्री, हरदीप सिंग पुरी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री, मनसुख मांडविय कामगार आणि रोजगार मंत्री आणि युवा कार्य तथा क्रीडा मंत्री, जी. किशन रेड्डी कोळसा मंत्री आणि खाण मंत्री, चिराग पासवान अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री, सी. आर. पाटील जलशक्ती मंत्री

# पीककर्ज वाटपास बँकांचा आखडता हात

**नांदेड । प्रतिनिधी**

खरीप हंगाम तोंडावर असताना जिल्ह्यातील बँकांकडून कर्जवाटप संथगतीने सुरू आहे. त्यातच राष्ट्रीयीकृत, व्यापारी, खासगी बँकांनी कर्जवाटपास हात आखडता घेतल्याचे समोर आले आहे. ३ जूनपर्यंत ३१ हजार ६५२ शेतकऱ्यांना केवळ १६.४२ टक्के कर्जांचे वाटप करण्यात आले आहे. बियाणांपासून ◀◀ पान २ वर

### कर्जवाटपाचा साप्ताहिक लेखाजोखा

जिल्हा मध्यवर्ती बँकेला ४१६ कोटी ९१ लाखांचे उद्दिष्ट देण्यात आले. यात ६ हजार ६२९ शेतकऱ्यांना ६० कोटी ३५ लाख ३० हजार रुपये कर्जाचे वितरण केले. या बँकेची कर्ज वितरणाची टक्केवारी १४.४८ इतकी आहे. व्यापारी/खासगी बँकेला ९९३ कोटी १६ लाखांचे उद्दिष्ट देण्यात आले. यात ७ हजार ४०४ शेतकऱ्यांना ७९ कोटी ५६ लाख कर्जाचे वितरण केले. ८.०१ कर्ज वितरणाची टक्केवारी आहे. या बँका कासवगतीने कर्जांचे वितरण करत आहेत, तर ग्रामीण बँक ४१५ कोटी ६६ लाखांचे उद्दिष्ट देण्यात आले. यात १७ हजार ६१९ शेतकऱ्यांना १५९ कोटी ९४ लाख कर्जाचे वितरण केले. ३८.४८ कर्ज वितरणाची टक्केवारी आहे.

## जरांगे यांच्याविरोधात अपशब्द वापरणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात अपशब्द वापरणा–या तिघांविरोधात बीडच्या शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.**

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या संदर्भात वादग्रस्त पोस्ट केल्याच्या कारणावरून दोन दिवसांपूर्वी शिरूर शहर बंद करण्यात आले होते. या बंदमध्ये जे भाषण करण्यात आले त्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात वादग्रस्त वक्तव्य करण्यात आले होते. या वक्तव्यावरुन माजी जि.प. सदस्य दशरथ वनवे, रामराव खेडकर, रामदास बडे व इतर प्रमुख १५ ते २० जणांविरुध्द बीडच्या शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये हनुमान मुळीक यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले होते की, मनोज जरांगे पाटील यांच्यावर अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न शिरूर मधल्या ◀◀ पान २ वर

## बाहेर खयालीपणा बीडच्या अधिकाऱ्याला चांगलाच भोवला

### पत्नीसह मुलाने भर चौकात बदडले, ओढत नेले ठाण्यात

**बीड । प्रतिनिधी**

**बाहेर खयालीपणा जिल्हा परिषदेच्या एका अधिकाऱ्याला चांगलाच भोवला आहे. पत्नी आणि मुलांनी बीड शहरातील राजीव गांधी चौकामध्ये संबंधित अधिकाऱ्याला गाठून बेदम बदडले. यातील महिला आणि मुलांनी अधिकारी असलेल्या पतीला अगोदर पोलीस अधीक्षक कार्यालय आणि त्यानंतर शिवाजीनगर पोलीस ठाणे गाठून आपली कैफियत मांडली.**

जिल्हा परिषदेच्या एका अधिकाऱ्याला पहिली पत्नी आणि मुले आहेत. मात्र त्याचे बाहेरच्या एका महिलेबरोबर प्रेम संबंध असल्याने तो तिच्याबरोबरच राहत होता. तर दुसरीकडे पत्नी आणि मुले यांना वाऱ्यावर सोडले होते, असं महिला आणि तिच्या मुलांचं म्हणणं आहे. त्यामुळे सोमवारी दुपारनंतर संबंधित अधिकाऱ्याला बीड शहरातील राजीव गांधी चौकात गाठून बेदम मारहाण करण्यात आली. त्यामुळे राजीव गांधी चौकात बराच वेळ गोंधळ निर्माण झाला होता. तेथून त्या महिला आणि तिच्या मुलांनी संबंधित अधिकाऱ्याला पोलीस अधीक्षक कार्यालयात नेले त्यानंतर तेथून शिवाजीनगर पोलीस स्टेशन गाठले. यावेळी बराच वेळ अधिकारी, त्याची पत्नी आणि ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १४.०० क्विंटल | २,२२६ | ३,१०१ | २,४६९ |
| ज्वारी/हायब्रिड : १६८.५० क्विंटल | १,८०० | ४,४६० | २,३८६ |
| मूग : ०.५० क्विंटल | ७,८१० | ७,८१० | ७,८१० |
| तूर : ८.०० क्विंटल | ११,१९९ | ११,४०१ | ११,३२५ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ४६.५० क्विंटल | २,३०१ | २,७०१ | २,४८५ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: २००.५० क्विंटल | ४,४७५ | ४,५२१ | ४,४९२ |
| हरभरा: १९.५० क्विंटल | ५,८०० | ६,६०१ | ६,२६३ |

## शिंदेंना जितक्या जागा तितक्याच आम्हालाही मिळाव्यात–भुजबळ

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभेसारखे विधानसभेच्या जागावाटपाचे गु–हाळ शेवटपर्यंत चालवून तुमचा फायदा होणार नाही असे सांगत राष्ट्रवादी नेते छगन भुजबळांनी विधानसभेला शिंदेंना मिळतील इतक्याच जागा आम्हालाही मिळायला हव्यात



असे विधान केले आहे. मुंबईत झालेल्या राष्ट्रवादीच्या वर्धापन दिन सोहळ्यात भुजबळ बोलत होते.

यावेळी छगन भुजबळ म्हणाले की, आम्हाला कमीत कमी ८० जागा मिळाल्या पाहिजेत अशी मी म्हटले, त्यानंतर ताबोडतोब माझ्याविरोधात हे असे नाही बोलायचे वैगेरे..बरे नाही बोलत. पण ◀◀ पान २ वर

## महामार्गावरील रस्त्याला आले तलावाचे स्वरुप

### आ.लक्ष्मण पवारांकडून दखल

**गेवराई । प्रतिनिधी**

गढी ते माजलगांव या राष्ट्रीय महामार्गावरील सिरसदेवी जवळ रस्त्यावर पाणी जमा होवू लागले. या ठिकाणी तलावाचे स्वरुप निर्माण झाल्याने वाहतूकीला अडथळा निर्माण होवू लागला. त्यामुळे ग्रामस्थांना त्रास होत आहे याची दखल आ.लक्ष्मण पवार यांनी घेवून याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिकार्यांना निर्देश देत घटनास्थळी पाहणी करण्यासाठी पाठवले. अधिकार्यांनी ज्याठिकाणी ◀◀ पान २ वर



# अमेरिकेत ‘गुगल पे’ बंद; भारतात नेमकं काय होणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

**सध्या तंत्रज्ञानाचे युग आहे. कधीकाळी बँकेशी संबंधित एखादे काम करण्यासाठी पूर्ण दिवस जायचा. आता मात्र तुम्ही पैशांचे व्यवहार मोबाईल किंवा इंटरनेट बँकिंगच्या माध्यमातून काही सेकंदांत पूर्ण करू शकता. यूपीआयच्या मदतीने ऑनलाईन पद्धतीने पैशांचे व्यवहार करणे आणखी सोपे झाले आहे. ऑनलाईन पेमेंट क्षेत्रात रोज नवनवे बदल होत असतात. सध्या ऑनलाईन पेमें प्लॅटफॉर्म गुगल पेने मोठे निर्णय घेतला आहे. सध्या गुगल पे हे ॲप एका देशात बंद करण्यात आले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार अमेरिकेत ४ जून २०२४ पासून गुगल पे हे ॲप बंद करण्यात आले आहे. हा निर्णय नेमका का घेण्यात आला? याबाबत नेमके आणि ठोस कारण समोर आलेले नाही. गुगल पे हे ॲप




ऑनलाईन व्यवहारांसाठी सुरक्षित मानले जाते.

भारताने वापराच्या बाबतीत हे ॲप दुसऱ्या क्रमांकावर आहे. असे असताना अमेरिकेत हे ॲप बंद करण्यामागचं कारण काय? असं विचारलं जातंय. गुगलने अमेरिकेत गुगल पे हे ॲप बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेत गुगलकडून गुगल वॉलेटला प्रमोट केलं जातंय. तसेच ऑनलाईन पेमेंट आणखी सोपे व्हावे यासाठी गुगलकडून प्रयत्न केले जात आहेत. याच कारणामुळे अमेरिकेत गुगल पे बंद करण्यात आल्याचे म्हटले जात आहे. भारतात मात्र गुगल पे हे ॲप बंद होणार नाही. ते भारतात जसे आहे, तसेच चालू राहील. भारत ही एक मोठी बाजारपेठ आहे. हे ॲप वापरून आर्थिक व्यवहार करणाऱ्यांचे भारतात मोठे प्रमाण आहे. हे ग्राहक हातातून जाऊ नयेत म्हणून गुगल पे या ॲपची सुविधा भारतात चालूच राहील. दुसरीकडे अमेरिकेत ◀◀ पान २ वर

## अग्रलेख

# मोदींनी नेहरूंची बरोबरी साधली

लोकसभा निवडणुकीत मतदारांनी दिलेला नवा जनादेश शिरसावंद्य मानून नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेत आपले ७२ मंत्र्यांचे जम्बो मंत्रिमंडळ रविवारी जाहीर केले. मोदी यांनी सलग ३ वेळा पंतप्रधान झालेले देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची बरोबरी साधली. मोदी यांच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारमध्ये ३० कॅबिनेट, ५ राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि ३६ राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळात सर्वाधिक ११ मंत्री उत्तर प्रदेशचे तर महाराष्ट्राचे ६ मंत्री आहेत. ज्या तेलगू देसम आणि जदयुच्या पाठिंब्यावर हे सरकार विसंबून आहे त्यांना प्रत्येकी २ केंद्रीय मंत्रिपदे देण्यात आली आहेत. कोकण आणि मराठवाड्याला मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व मिळालेले नाही. शिंदे गटाचे प्रताप जाधव यांना मंत्रिपद मिळाले आहे तर अजित पवार गटाला एकही मंत्रिपद मिळालेले नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाला एका मंत्रिपदाचा प्रस्ताव देण्यात आला होता. राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार असे हे खाते होते; पण अजित पवार गटाला कॅबिनेट मंत्रिपद हवे होते. आघाडी सरकारमध्ये अनेक पक्ष सोबत असतात आणि मंत्रिपद देताना काही निकष लावले जातात. एका पक्षाकरिता तो निकष मोडता येत नाही त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तारावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचा विचार केला जाईल, असे गाजर अजित पवार गटाला दाखवण्यात आले आहे म्हणजेच एका प्रकारे अजित पवारांची 'दादागिरी' संपविण्यात आली आहे.

शरद पवारांना एकटे पाडून त्यांचे ४० आमदार फोडण्याची कामगिरी केलेल्या अजित पवारांना मानाचे स्थान देण्याऐवजी त्यांच्या बाबतीत सतत तडजोड केली जात आहे. राज्यातील मंत्रिमंडळातही त्यांना केवळ ९ मंत्रिपदे देण्यात आली आहेत. राष्ट्रपती भवनातील भव्य प्रांगणात आयोजित दिमाखदार सोहळ्यात, देशविदेशांतील मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. मोदी यांनी सर्वप्रथम २०१४ त्यानंतर २०१९ आणि आता २०२४ मध्ये पंतप्रधान पदाची शपथ घेतली. मोदी मंत्रिमंडळात जातीय समीकरण जुळवण्यात आले आहे. यात २७ ओबीसी, १० अनुसूचित जाती, ५ अनुसूचित जमाती, ५ अल्पसंख्याक नेत्यांचा समावेश आहे. मोदी सरकार ३.० मध्ये महाराष्ट्रातील माजी मंत्री नारायण राणे, भागवत कराड, भारती पवार तसेच स्मृती इराणी, अनुराग ठाकूर, मीनाक्षी लेखी यांना वगळण्यात आले आहे. शपथविधी सोहळ्यापूर्वी मंत्रिमंडळात समाविष्ट होणाऱ्या नेत्यांना तसेच मावळत्या मंत्रिमंडळातील वरिष्ठ नेत्यांना संबोधित करताना नम्रतेने वागण्याबरोबरच प्रामाणिकपणे व पारदर्शकतेसोबत कदापिही तडजोड करू नका, असा सल्ला दिला. नेत्यांचे नम्रपणे वागणे हे सामान्य जनतेला आवडते, असे मोदी म्हणाले. निवडणुकीत भाजपला जोरदार चपराक मिळाल्यामुळे मोदींना हा साक्षात्कार झाला असावा! नव्या मंत्रिमंडळात दक्षिण भारताला झुकते माप देण्यात आले आहे. द. भारतात भाजपचा फारसा प्रभाव नसल्याने या क्षेत्रातील राज्यांना मंत्रिमंडळात झुकते माप देण्यात आले आहे. आंध्र प्रदेश, तेलंगणातील अनेक खासदारांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. आंध्र प्रदेशात रालोआने २५ पैकी २१ जागा जिंकल्या आहेत. त्यात तेलगू देसम पक्षाचे १६ खासदार आहेत त्यामुळे आंध्र प्रदेशातील तेलगू देसम व भाजपच्या प्रत्येकी २ खासदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. तेलंगणामध्ये १७ पैकी ८ जागा जिंकणाऱ्या भाजपने दोघांना मंत्रिपद दिले आहे. कर्नाटकात रालोआला २८ पैकी १९ जागा मिळाल्या. भाजपने १७ तर जनता दलने (निरपेक्ष) २ जागा जिंकल्या.

जनता दल नेते आणि माजी मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी केंद्रीय मंत्रिपदाची शपथ घेतली. आंध्र प्रदेशात रालोआचा घटक पक्ष म्हणून २ जागा जिंकणाऱ्या जन सेनेला लोकसभेचे उपाध्यक्षपद मिळण्याची शक्यता आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी पहिल्यांदाच केंद्रीय मंत्रिपदाची शपथ घेतली. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात संविधान बदलण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचा विरोधकांचा मुद्दा प्रभावी ठरला आणि मुस्लिमांबरोबरच दलित मतेही विरोधात गेल्याने महायुतीला मोठा फटका बसला होता. दलित मतांवर डोळा ठेऊनच रिपब्लिकन पक्षाचे नेते रामदास आठवले यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात तिस-यांदा समावेश करण्यात आला आहे. भाजपने पुण्यातून प्रथम निवडून आलेले मुरलीधर मोहोळ यांना मंत्रिपदाची संधी दिली. म्हणजेच पुण्यात हात-पाय पसरण्यास भाजप इच्छुक आहे. वास्तविक पुणे हा अजित दादांचा बालेकिल्ला. अनेक वर्षे ते पुण्याचे पालकमंत्री राहिले आहेत. या जिल्ह्यात त्यांचा वरचष्मा आहे मात्र बारामती निवडणुकीत त्यांचा वरचष्मा दिसून आला नाही. आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेऊन भाजपने मुरलीधर मोहोळ यांना ताकद दिली आहे.

भाजपने रक्षा खडसे यांनाही मंत्रिपदाची संधी दिली आहे. रावेरमधून त्या तिस-यांदा निवडून आल्या आहेत. त्यांना पक्षनिष्ठेचे फळ मिळाले आहे. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने भाजपने आपल्या सहका-यांना बळ देण्याची व्यूहरचना आखल्याचे दिसून येते. मंत्रिपदे देताना मात्र भाजपने मित्रपक्षांच्या बाबतीत आपले हातचे राखून ठेवण्याचे धोरण कायम ठेवले आहे. कॉंग्रेसमधून भाजपात दाखल झालेले अशोक चव्हाण यांना मंत्रिपद मिळेल, असे वाटले होते; परंतु नांदेडची जागा हातातून गेल्याने विधानसभा निवडणुकीत त्यांचा कितपत फायदा होईल याबाबत भाजप साशंक आहे. मोदी यांचे रालोआ सरकार सर्वसामान्यांच्या अपेक्षापूर्तीच्या दृष्टीने कारभार करेल, अशी आशा आणि त्यासाठी शुभेच्छा!

# प्रतिकूल परिस्थितीवर मात देत शेवटी यशाचं शिखर गाठलंच

**बीड । प्रतिनिधी**

वडील व मोठा भाऊ यांची चहाची टपरी घरची परिस्थिती अतिशय बिकट अशा परिस्थितीमधूनही आई-वडील व मोठ्या भावाच्या कष्टाची जाणीव ठेवत अथक परिश्रम घेत नेहमी वाट्याला येणारे अपयश पचवत शेवटी यशाने त्याच दार ठोठावले च सोलापूर महानगरपालिका येथे (क्लास ३) टेक्निकल ऑपरेटर या पदावर दीपक कांबळे ची निवड झाली . त्याने कलर काम ,फायनान्स ऑफिस मध्ये काम करत असताना अभ्यासात सातत्य ठेवत हे यश संपादन केले असून त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे. कष्टाला फळ उशिरा का होईना हे मिळतच दीपकच्या या जिद्दीला, संयमाला, सलाम त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# सराटेवडगाव येथील १०६ वर्षीय पैलवान भगवानबापु बोडखे यांचे निधन

**संत तुकाराम महाराजांचे वंशज शिवाजी महाराज मोरे यांच्या हस्ते भगवानबापुंचा अलिकडेच झाला होता सत्कार**

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव-आनंदवाडी येथील जुन्या पिढितील १०६ वर्षे वयाचे पैलवान भगवानबापु दशरथ बोडखे यांचे सोमवारी दुपारी वृध्दापकाळाने अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्यापाठीमागे मारुती बोडखे व रोहिदास बोडखे हे दोन भाऊ व छबुबाई माणिकराव धोंडे (रुईनालकोल) व ताईबाई पुंडे (केळ पिंपळगाव ) या दोन बहिणी आहेत.त्यांच्यासह सहा भाऊ होते.पैकी रामभाऊ बोडखे, लक्ष्मणनाना बोडखे,संभु बोडखे हे मृत्यू पावलेले आहेत.दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांचे ते चुलते आहेत.सराटेवडगांव ग्रामपंचायतमध्ये या सराटेवडगांवातील पाच शतायुषी शतकवीरांचा सन्मान संत तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे यांच्या हस्ते काही महिन्यापुर्वीच सत्कार करण्यात आला होता.माजी आ.भीमराव धोंडे,माजी आ. साहेबराव दरेकर यांनी भगवानबापु बोडखे यांची अलिकडेच सदिच्छा भेट घेतली होती.शनिवार व रविवारी थोडे आजारी पडले आणि त्यातच त्यांना देवज्ञा झाली.सराटेवडगांव येथील मेहकरी नदीकाठी वैकुंठधामात सायंकाळी अंत्यविधी करण्यात आला.



अंत्यविधीस ह.भ.प.निवृत्तीदादा बोडखे महाराज,राजेंद्र धोंडे,विठ्ठलआण्णा बनसोडे,प्राचार्य डॉ.हरिदास विधाते, नामदेव राऊत,पोपटराव घुले सर, उपसभापती नामदेव धोंडे,अर्जुन खेडकर दाजी,प्रा.डा.बाळासाहेब धोंडे, संदीप सुंबरे,सेवानिवृत्त पीएसआय शेख अन्सारभाई,चेअरमन बबन नन्नवरे, चेअरमन राजाराम नन्नवरे,महादेव शिंदे, ह.भ.प.आप्पासाहेब सुंबरे महाराज, उपप्राचार्य संजय धोंडे,निळकंठ सुंबरे, प्राचार्य सुरेश बोडखे,प्रा.डा.जी. पी.बोडखे ,पत्रकार दिगांबर बोडखे, इंजि.पी.बी.बोडखे,सुनिल बोडखे, भानुदास बोडखे,सरपंच भीमराव बोडखे आदि सामाजिक,राजकीय,धार्मिक क्षेत्रातील मान्यवर,परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिंद्रुड येथे महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत

## भारतीय वंशावळीची २००० झाडे लावणार-बाळासाहेब घोगरे

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने पर्यावरण दिनानिमित्त आयोजित महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे दिंद्रुड येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथून निघालेल्या सदरील यात्रेचा समारोप नांदेड येथे होणार आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शेतकरी बांधवांच्या मदतीने भारतीय वंशावळीची दोन हजार झाडे लावण्यात येणार असल्याची माहिती असिस्टंट जनरल मॅनेजर बाळासाहेब घोगरे यांनी दिली. शाखेतील कर्मचारी व खातेदार शेतकऱ्यांनी संवाद यात्रेतील मान्यवरांचे स्वागत केले.**

पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी महा ग्रामीण नवचेतना समाज यात्रेचे प्रयोजन आहे. शेतकरी सभासदांच्या मदतीने महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने भारतीय प्रजातीची जवळपास २००० झाडे लावण्यात येणार आहेत. त्याचबरोबर शेतकरी मित्रांचे बँकेबरोबर असलेलं अतूट नातं दृढ करण्यासाठी शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात येणार आहे. नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांचा वृक्ष देऊन सन्मान करण्यात येणार असल्याचे बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक वानखेडे यांनी सांगितले.

या संवाद यात्रेदरम्यान ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना पीक कर्जाचा परतावा, सायबर सिक्युरिटी, मोबाईल फ्रॉड याबाबत कुठली दक्षता घ्यायला पाहिजे हे समजावून सांगण्यासाठी पथनाट्याच्या द्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. तर काही शेतकऱ्यांसोबत थेट संवाद साधण्यात येत आहे. केवळ २० आणि ४३६ रुपयात भारत सरकार व बँकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या इन्शुरन्स योजनेची माहिती दिली जात आहे. जेणेकरून




शेतकऱ्याचा अनावधानाने अपघात झाल्यास त्याचा फायदा होईल. शेतकऱ्यांनी पीक कर्जाची परतफेड ३१ मार्च पूर्वी केल्यास त्याला व्याज परतावा खात्रीशीर मिळत असल्याचे उप क्षेत्रीय व्यवस्थापक चिवटे व वसुली विभाग प्रमुख भराटे यांनी सांगितले.

एप्रिल पासून व्याज परतावा म्हणुन बँकेला जवळपास ६३ कोटी रुपयांची प्राप्ती झालेली आहे. पर्यावरणाचा संदेश घेऊन जवळपास पंधराशे किलोमीटरचा प्रवास केलेल्या या यात्रेचा समारोप १५ तारखेला नांदेडला येथे होणार आहे. यावेळी दिंद्रूड शाखा व्यवस्थापक विष्णू मिसाळ, सह शाखा व्यवस्थापक तेजस सदरे, रोखपाल प्रसाद कापडणे, मदतनीस सुरेश मुळे, नवनाथ देशखैरे, शिवाजीराव बडे, बंडूजी खांडेकर, अंकुश ठोंबरे, राम बसेट, गणेश वाघमोडे, राज झोडगे, राधाकिसन शिंदे, संभाजी सोळंके आदीसह शेतकरी बांधव उपस्थित होते.

## पान १वरून...

### किसान सन्मान निधीचा

खात्यात पाठवली जाते. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी काल सायंकाळी राष्ट्रपती भवनात पार पडला. नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणारे नरेंद्र मोदी हे तिसरे पंतप्रधान ठरले आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजप प्रणित एनडीएला २९३ जागा मिळाल्या आहेत. एनडीए आणि भाजपाचे संसदीय नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची एकमताने निवड झाली होती. त्यानंतर रविवारी शपथविधी सोहळा पार पडला. बांगलादेश, श्रीलंका, मालदीव, भूतान, नेपाळ, मॉरिशस आणि सेशेल्स यांसारख्या शेजारील देशाचे प्रमख यांच्यासह विविध क्षेत्रातील तब्बल ८,००० पाहुणे शपथविधीला उपस्थित होते.

------------

### महाराष्ट्रातील दोन्ही कॅबिनेट

मुख्यमंत्रिपद काढून घेत केंद्रात बोलावणं धाडलेल्या शिवराज सिंह चौहान यांना कृषीमंत्रिपद देण्यात आलं आहे.

**राज्यमंत्री आणि त्यांच्याकडील खाती**

जितिन प्रसाद वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे राज्यमंत्री; इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे राज्यमंत्री., श्रीपाद येसो नाईक ऊर्जा मंत्रालयाचे राज्यमंत्री., पंकज चौधरी अर्थ राज्यमंत्री., कृष्ण पाल सहकार राज्यमंत्री., रामदास आठवले सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री., राम नाथ ठाकूर कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री., नित्यानंद राय गृह राज्यमंत्री., अनुप्रिया पटेल आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री, रसायने आणि खते राज्यमंत्री., व्ही. सोमन्ना जलशक्ती राज्यमंत्री आणि रेल्वे राज्यमंत्री., चंद्रशेखर पेम्मासानी ग्रामीण विकास राज्यमंत्री आणि दळणवळण राज्यमंत्री., एस. पी. सिंह बघेल मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय राज्यमंत्री आणि पंचायती राज राज्यमंत्री., शोभा करंदलाजे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग राज्यमंत्री आणि कामगार आणि रोजगार राज्यमंत्री. कीर्तिवर्धन सिंह पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्री आणि परराष्ट्र राज्यमंत्री.,बी.एल. वर्मा ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण राज्यमंत्री आणि सामाजिक न्याय तथा सक्षमीकरण राज्यमंत्री., शंतनू ठाकूर बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग राज्यमंत्री., सुरेश गोपी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री आणि पर्यटन राज्यमंत्री., डॉ. एल. मुरुगन माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री., अजय टम्टा रस्ते वाहतूक आणि महामार्ग राज्यमंत्री., बंदी संजय कुमार गृह राज्यमंत्री., कमलेश पासवान ग्रामीण विकास राज्यमंत्री., भगीरथ चौधरी कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री., सतीशचंद्र दुबे कोळसा आणि खणिकर्म राज्यमंत्री, संजय सेठ संरक्षण राज्यमंत्री., रवनीत सिंह अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री आणि रेल्वे राज्यमंत्री., दुर्गादास उईके आदिवासी व्यवहार राज्यमंत्री.,रक्षा खडसे युवा कार्य आणि क्रीडा राज्यमंत्री., सुकांता मजुमदार शिक्षण राज्यमंत्री आणि ईशान्य क्षेत्राच्या विकास विभागाचे राज्यमंत्री., सावित्री ठाकूर महिला आणि बालविकास राज्यमंत्री., तोखन साहू गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार राज्यमंत्री., राजभूषण चौधरी जलशक्ती राज्यमंत्री., भूपती राजू श्रीनिवास वर्मा अवजड उद्योग राज्यमंत्री आणि पोलाद राज्यमंत्री, हर्ष मल्होत्रा - कॉर्पोरेट व्यवहार राज्यमंत्री आणि रस्ते वाहतूक तथा महामार्ग राज्यमंत्री., निमूबेन बांभनिया ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण राज्यमंत्री., मुरलीधर मोहोळ सहकार राज्यमंत्री आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री., जॉर्ज कुरियन अल्पसंख्याक व्यवहार राज्यमंत्री आणि मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन तथा दुग्धव्यवसाय राज्यमंत्री, पबित्रा मार्गेरिटा परराष्ट्र राज्यमंत्री आणि वस्त्रोद्योग राज्यमंत्री., स्वतंत्र कारभार असलेले राज्यमंत्री आणि त्यांच्याकडील खाती, राव इंद्रजित सिंह सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी राज्यमंत्री, नियोजन राज्यमंत्री, सांस्कृतिक विभागाचे राज्यमंत्री., डॉ. जितेंद्र सिंह विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री, पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री, कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्ती वेतन राज्यमंत्री, अणुऊर्जा राज्यमंत्री, अंतराळ विभागातील राज्यमंत्री, अर्जुन राम मेघवाल कायदा आणि न्याय मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री., प्रतापराव जाधव आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि आरोग्य तथा कुटुंब कल्याण राज्यमंत्री., जयंत चौधरी कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि शिक्षण राज्यमंत्री

------------

### सव्वातीन लाख टन

(चौसाळा, अंजनगाव)द्वारे ३७५.९५, हायर्ड हॅन्ड ॲग्रो कंपनी (पुसला, वरुड)द्वारे ३८८.७८, प्रहारशक्ती कंपनीचा (रायपूरा, अचलपूर) २३०.७३, एलएमके कंपनी (चांदूरबाजार)द्वारे ३५४.८, टॅगी ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी (अमरावती)द्वारे २८९.९ लाख रुपयांचा प्रकल्प आराखडा सादर करण्यात आला आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून प्राथमिकस्तरावर स्वच्छता, प्रतवारीची प्रक्रिया केली जाणार असल्याचे राहुल सातपुते यांनी सांगितले. या प्रकल्पाच्या माध्यमातून वर्षाला सुमारे ९६ हजार संत्रा फळांवर प्राथमिक प्रक्रियेचे काम होणार आहे. यापूर्वी जिल्ह्यात ३३ प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित आहेत. त्यांची वार्षिक प्रक्रिया क्षमता २ लाख २८ हजार इतकी आहे. जिल्ह्यातील सद्यःस्थितीतील क्षमता व प्रस्तावित प्रकल्पांचा विचार केल्यास जिल्ह्याच्या एकूण उत्पादनापैकी ५० टक्के संत्रा फळांवर प्राथमिक प्रक्रिया करणे येत्या एक वर्षात शक्य होणार आहे. जर २० टक्के निरुपयोगी ठरणाऱ्या फळांचा विचार केल्यास ६२ टक्क्यांपेक्षा जास्त संत्रा फळांवर प्राथमिक प्रक्रिया करता येईल. संत्रा स्वच्छता, प्रतवारीची आणि वॅक्स कोटिंग अशा प्राथमिक प्रक्रियेमुळे फळांची गुणवत्ता आणि टिकवणक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

--------------

### बाहेर खयालीपणा बीडच्या

त्याची मुले शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये बसून होते. मात्र हे कौटुंबिक प्रकरण आहे या उद्देशाने काही लोकांनी मध्यस्थी केल्याचे समजते. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. मात्र संबंधित अधिकारी कोण याविषयी शहरांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये चर्चा सुरू होती.

--------------

### जरांगे यांच्याविरोधात अपशब्द

या तीन व्यक्तींनी केला. तसेच इतर लोकांनी सुद्धा त्यांना या संदर्भात सहकार्य केले, त्यामुळे गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती.

------------

### पीककर्ज वाटपास

ते खतापर्यंत सर्व गोष्टींसाठी पीककर्जाचा आधार घेतला जातो. परंतु, कर्जासाठी बँकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने शेतकरी खेटे मारून त्रस्त झाले आहेत. मागील खरीप हंगामात पीक काढणीवेळीच जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. त्यानंतर रब्बीतही अवकाळीचा सामना करावा लागला. यामुळे शेतकरी खचून गेला. या सर्व संकटाला तोंड देत पुन्हा एकदा उभारी घेत नव्या जोमाने बळिराजा खरिपाच्या तयारीला लागला आहे. शेतकऱ्यांना पेरणीपूर्व मशागतीसाठी पैशांची चणचण भासू नये, कामे वेळेत होऊन शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ व्हावी, या उद्देशाने पीककर्जाचे वाटप केले जाते. शेतकऱ्यांना ऊर्जितावस्था देण्यासाठी पीककर्ज महत्त्वाचे माध्यम आहे. एप्रिलपासूनच या प्रक्रियेला सुरवात होते. परंतु, बहुतांश खासगी बँका कर्जवाटपास सकारात्मकता दाखवीत नसल्याचे दिसून येते नांदेड जिल्ह्याला यावर्षी १८२५ कोटी ७३ लाखांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. परंतु, आतापर्यंत ३१ हजार ६५२ शेतकऱ्यांना २९९ कोटी ८५ लाख ३० हजार रुपये पीककर्ज वितरित केले आहे. यात राष्ट्रीयीकृतमध्ये एसबीआय, तर खासगीमध्ये एचडीएफसी, आयसीआयसीआय, महाराष्ट्र ग्रामीण आणि डीसीसी बँकांकडून चांगले पीककर्ज वाटप होत असले, तरी काही बँकांकडून अल्प प्रतिसाद मिळतो आहे; तसेच काही खासगी बँकांकडून एकाही शेतकऱ्याला पीककर्ज दिले गेले नसल्याचे साप्ताहिक अहवालातून समोर आले आहे.

------------

### महामार्गावरील रस्त्याला

पाणी जमा होते त्याठिकाणी १ कि.मी.सिमेंट रस्ता व भूयारी नाली करण्याचे आश्वासन दिले आहे. गेल्या काही महिन्यापूर्वी विशाखापटनम महामार्गाचे काम झाले हा महामार्ग गढी ते माजलगाव या दरम्यान जात आहे. महामार्गावरील सिरसदेवी फाट्याजवळ पाणी जमा होवू लागले. दोन दिवसापासून पाऊस पडत असल्यामुळे सदरील ठिकाणी तलावाचे स्वरुप आले. रस्त्यावर पाणी जमा होत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होवू लागला. याची दखल घेवून आ.लक्ष्मण पवार यांनी महामार्ग अधिकार्यांना निर्देश दिले. त्यानूसार आज अभियंता कादरी, खंदारे, पत्रकार सुभाष सुतार,भागवत जाधव, दादासाहेब गिरी,प्रल्हाद येळापुरे,श्रीराम घाटुळ, शरद कादगे,यांनी घटनास्थळी जावून रस्त्याची पाहणी केली. ज्याठिकाणी पाणी जमा होते. तेथे एक कि.मी. सिमेंट रस्ता व भुयारी नाली करुन पुन्हा रोडवर पाणी थांबणार यांची काळजी घेऊन दोन दिवसात काम सुरु करण्याचे आश्वासन आधिका-यांनी दिले आले. यावेळी परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

--------------

### शिंदेंना जितक्या जागा

आहेत. शिंदेंकडेही तेवढे आहेत. त्यामुळे त्यांना जितक्या जागा मिळणार तितक्या आम्हालासुद्धा मिळायला हव्यात. त्यावेळी शिंदेंचे खासदार जास्त म्हणून त्यांना जास्त जागा असं करू नका. सगळ्यांनी समजून काम करायला हवे असे त्यांनी म्हटले. तसेच एकमेकांचे हात धरून सरकार स्थापन करू. भांडणे वैगेरे करू नका. सगळ्यांना उमेदवारी द्या. सर्व समाज घटकांचा विचार करून उमेदवारी द्यावी लागेल. दलित, आदिवासी यांच्या राखीव जागा आहेत त्यांचा प्रश्न ९९ टक्के सुटला आहे. परंतु बाकी जे भटके, विमुक्त, ओबीसी आहेत त्यांनाही आपल्यासोबत ठेवावे लागेल. राष्ट्रवादी कॉंग्रेस म्हणून आपल्याला काही गोष्टी कराव्या लागतील. दलित, मुस्लीम, आदिवासी, भटके विमुक्त हे सगळे मतदार आपल्यासोबत येतील असा विश्वास त्यांच्यात निर्माण करावा लागेल असंही छगन भुजबळ यांनी सांगितले. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येकाला १ मत दिले आहे. अख्ख्या भारतात अनेक ठिकाणी अपप्रचार झाला. फक्त महाराष्ट्रात नाही तर यूपीतही परिणाम झाला. इंडीया आघाडी हे लोकांची दिशाभूल करण्यात यशस्वी झाले. प्रत्येक समाजाला आपल्याला पुढे एकत्रित घेऊन जाऊ या, सगळ्यांना विश्वासात घेऊन काम करूया. लोकसभेला मला फार कमी भाषण करण्याची संधी मिळाली. माझा फोटो छापला तर मते कमी होतील असे काहींना वाटले. पण ती मते गेली आणि हीदेखील गेली. ठीक आहे. आपल्याला पुढे काम करायचे आहे असेही छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

------------

### अमेरिकेत 'गुगल पे' बंद;

गुगल पेच्या तुलनेत गुगल वॉलेट वापरणाऱ्यांचे प्रमाण हे पाच पट अधिक आहे. याच कारणामुळे अमेरिकेत गुगल पे हे ॲप बंद केले जात आहे. गुगलने अमेरिकेत गुगल वॉलेट हे ॲप २०२२ साली लॉन्च कले होते. हेच ॲप भारतात २०२४ साली लॉन्च करण्यात आले. गुगल वॉलेट हे ॲप सध्या गुगल पेवर उपलब्ध आहे. अमेरिकेत गुगल पे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परिणामी तेथे गुगल पे वापरणाऱ्यांना थेट गुगल वॉलेट वापरायला चालू करावे लागणार आहे. कंपनीने याआधी सांगितल्यानुसार भविष्यात १८० देशांत गुगल पेच्या ऐवजी गुगल वॉलेट हेच चालू ठेवले जाणार आहे. या देशांत गुगल वॉलेट बंद केले जाणार आहे.

--------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. ११ जून २०२४ 

## अंधारे मॅडम शिवराज पान सेंटर जवळ जीव गेल्यावर खड्डा बुजवणार का? -सरपते



**बीड। प्रतिनिधी**

बीड शहरात सर्वत्र रस्ते करण्याचे काम सुरू असून मागील वर्षीच झालेला रस्त्याला मोठं भगदाड पडल्याची तक्रार नगर परिषद मुख्याधिकारी निता अंधारे बीड यांना वंचितचे मिलिंद सरपते यानी केली.की गेल्या वर्षी प्रमाणे यावर्षीही पावसामध्ये बीड शहरातील शिवराज पान सेंटर, पोलीस अधीक्षक चौक येथे रस्त्याला पडले मोठे भगदाड निकृष्ट दर्जाचे रस्ता कामाची चौकशी करून कंत्राटदारावर तात्काळ कारवाई करावी. एखाद्याचा जीव गेल्यावर खड्डा बुजवणार का? जनसामान्यातून सूर निघत आहे. वाहतुकीमुळे हा रस्ता खचत आहे. क्रॉसिंग चे काम पाच वेळेस झाले असून प्रत्यक्षात ते दोनच वेळेस झाल्याचे निदर्शनाश येत आहे. त्याची सखोल चौकशी करून कार्यवाही करावी.याचा जनसामान्यांना त्रास सहन करावा लागत आहे. प्रकरणी मुख्याधिकारी मॅडम यांनी तात्काळ लक्ष देऊन खड्डा बुजवण्यासाठी निर्देशित करावे. लवकरात लवकर रस्त्याला पडलेले भगदाड दुरुस्त न केल्यास अभिनव आंदोलन करण्याचा इशारा वंचितचे मिलिंद सरपते यांनी दिला आहे.

# शेतकऱ्यांच्या पिकाला आणि दुधाला हमीभाव मिळावा म्हणून राज्यभर काढणार गाय-म्हशी मोर्चा -नारायण अंकुशे

### शेतकरी संघटना आणि भारतीय जवान किसान पार्टीचे संयुक्त आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

**इस्लामपूर सांगली – शेतकऱ्यांच्या सर्व पिकाला आणि दुधाला हमीभाव मिळावा, तरूण तरूणीना रोजगार मिळावा यासाठी शेतकरी संघटनाचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील आणि भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायणजी अंकुशे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रतील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर गाय– म्हशी मोर्चा काढणार असा ठराव इस्लामपूर येथे झालेल्या शेतकरी संघटना आणि भारतीय जवान किसान पार्टी च्या संयुक्त राज्य कार्यकारिणी बैठकीत पारित करण्यात आला..**

शेतकरी संघटना आणि भारतीय जवान किसान पार्टी ने युती करून महाराष्ट्र भर लोकसभा निवडणुकीत आपले उमेदवार उभे करून लढविली होती.. यात पक्षाला यश आले नसुन याचे चिंतन करण्यासाठी शेतकरी संघटना आणि भारतीय जवान किसान पार्टी चे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील आणि नारायण जी अंकुशे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकरणीचे बैठकीचे आयोजन इस्लामपूर सांगली येथे केले होते.. या बैठकीस राज्यभरातील शेतकरी संघटना आणि भारतीय जवान किसान पार्टी पदाधिकारी उपस्थित होते.लोकसभातील पराभवाला खचुन न जाता आगामी विधानसभा निवडणुकीची जोमाने तयारी करून महाराष्ट्र विधानसभेते आपल्या विचारांचा जास्तीत जास्त आमदार पाठविण्याचा निर्णय या दोन्ही पक्षांच्या वतीने घेण्यात आला.देशात आणि राज्यातील जनता भाजपा आणि काँग्रेस यांच्या कार्य पध्दतीला वैतागून गेली असुन शेतकरी, शेतमजूर,तरूण, तरूणीना आणि सामान्य माणूस हतबल झाला असून याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत दिसून आला आहे. यात बळीराजाचे प्रचंड नुकसान होत असून महाराष्ट्रात आत्महत्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. राज्य शासनाचे डोळे उघडण्याकरता येत्या काही दिवसात महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील आणि भारतीय जवान किसान पार्टी चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण जी अंकुशे यांच्या नेतृत्वाखाली गाय– म्हशी मोर्चा काढला जाणार असून पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी याच्या तयारीला लागावी असे आव्हान या चिंतन बैठकीत करण्यात आले आहे.. या चिंतन शेतकरी संघटनेचे



कार्याध्यक्ष कालिदास आपेट,क्रांतिवीर नाना पाटील ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री शिवाजीराव नांदखेले , प्रदेशाध्यक्ष पोपटराव दाते कार्याध्यक्ष प्रमोद विचारे, सरचिटणीस समीर खानविलकर,अध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र कॅप्टन वसंत आजमाने , कॅडिनेटर जी बी जोशी, फेडरेशन अध्यक्ष विजय पाटील, कोल्हापूर माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष चंद्रहार पाटील वाळवा तालुका सचिव प्रवीण पाटील, सांगली जिल्हा अध्यक्ष पांडुरंग भोसले, सामाजिक कार्य करते श्री श्याम पिंपळे, श्री बी टी पाटील, श्री वाबळे, श्री विजय जगताप, जय जवान जय किसान संघटनेयांचे अध्यक्ष संजय जाधव, माजी सैनिक शिवाजी धनावडे कोल्हापूर, पुणे जिल्हा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भाऊ दौंडकर,शेतकरी संघटना उपाध्यक्षा डॉ प्रगती चव्हाण यांच्या सह राज्यभरातील हजारो महिला, युवा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जामखेड येथे सुलक्षणी अश्व घोड्याच्या अंगावर शिवप्रतिमा



**जामखेड । प्रतिनिधी**

जामखेड येथील राजन समिंदर सर यांनी माळेगांव जिल्हा नांदेड या ठिकाणाहून चार घोडे खरेदी केले. जामखेड येथे आल्यानंतर राजन समिंदर सर व त्यांचे सहकारी अरुण चव्हाण यांच्या घोड्याच्या अंगावर महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची अर्धाकृती प्रतिमा अगदी हुबेहूब असून हा आगळावेगळा अश्व जनतेच्या कुतुहलाचा विषय बनला आहे.निसर्गाचा चमत्कार म्हणून राजन समिंदर सर व अरुण चव्हाण यांनी या घोड्याला घरातील सदस्य म्हणून सांभाळत आहेत.राजन समिंदर सर हे प्राणी, पक्षी प्रेमी आहेत.प्राणी मात्रांवर प्रेम करा असा संदेश त्यांनी नागरिकांना दिला आहे. जामखेड येथे राज्याभिषेक सोहळा आयोजित कार्यक्रम मिरवणूकीत नागरिकांना पाहण्यास मिळणार आहे.अशी माहिती राजन समिंदर सर यांनी दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विकी भाऊ सदाफुले, विनोद सोनवणे सर, मिलिंद भोसले, किशोर कांबळे आदी उपस्थित होते.

## जामखेड-खर्डा रस्त्यावर एसटी बस व चारचाकी वाहनाचा अपघात दोन ठार तीन गंभीर जखमी



**जामखेड । प्रतिनिधी**

**जामखेड खर्डा रस्त्यावर बटेवाडी शिवारात एसटी बस व चारचाकी वाहनाचा समोरासमोर रात्री साडेबाराच्या सुमारास भिषण अपघात झाला यामध्ये पाच जण गंभीर जखमी झाले त्यांना जामखेड येथील खाजगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करून पोलिसांनी अहमदनगर येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी पाठवले होते उपचार घेत असताना त्यातील दोन जण मृत्यु पावल्याचे जाहीर केले असून तीन जणांवर उपचार चालू आहे.**

जामखेड खर्डा रस्त्यावर बटेवाडी शिवारात कोपरगाव आगाराची शिर्डी हैदराबाद बस शिर्डी येथे जात असताना रात्री साडेबाराच्या सुमारास एस.टी. क्रमांक च् क०९ ऋ्ङ १०२७ व वडगाव गुप्ता अहमदनगर येथील चारचाकी वाहन क्रमांक (एम एच १६ ए टि ६४९२) या दोन वाहनाची समोरासमोर धडकून भिषण अपघात झाला. याबाबत ११२ क्रमांकावरून जामखेड पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना फोन झाला असता त्यांनी तातडीने पेट्रोलिंग वाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक गौतम तायडे, पोलीस कॉन्स्टेबल देवीदास पळसे,पोलीस कॉन्स्टेबल संतोष भोरे वाहनचालक अडसुळ व १०८ क्रमांक व सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी हे आपले अँम्ब्यलन्स घेऊन पाठवले व पाच जखमी मयत विजय गंगाधर गव्हाणे २४, पंकज सुरेश तांबे २४मयुर संतोष कोळी वय १८ सचिन गिते वय २८ अमोल डोंगरे वय ३० सर्वजण वडगाव गुप्ता रा. अहमदनगर येथील असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार जामखेड येथील खाजगी रुग्णालयात करून अहमदनगर येथे सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवले उपचार सुरू असताना त्यातील विजय गंगाधर गव्हाणे २४, पंकज सुरेश तांबे रा.वडगाव गुप्ता अहमदनगर हे मयत झाले आहे.

पान ६ वरून...

### सद्गुरू श्री. संत वै. ह. भ. प. ज्ञानेश्वर

करण्यात आले असून यामध्ये पहाटे चार ते सहा काकडा भजन, सहा ते सात श्रीविष्णूसहस्त्रनाम ११:३० ते १:३० गाथा भजन , दुपारी २ ते ५ श्रीराम कथा रामायणचार्य श्री.ह.भ.प. समाधान महाराज शर्मा , पाच ते सहा हरिपाठ, रात्री संकीर्तन सेवा ८:३० ते १०:३० हरिकीर्तन व त्यानंतर संगीत भजन हरी जागर व भारुड असे कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत. शुक्रवार दि. १४ जून २०२४ ह. भ. प. लक्ष्मण महाराज मेंगडे श्री. बंकट स्वामी मठसंस्थान श्री क्षेत्र नेकनुर शनिवारवार दिनांक १५ जून २०२४ संत पिठाचार्य श्री ह भ प प्रकाश महाराज बोधले संतपिठ श्रीक्षेत्र पैठण तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय वारकरी मंडळ यांचे कीर्तन होईल. रविवार दिनांक १६ जून २०२४ रोजी ह.भ.प. अमृता आश्रम स्वामी महाराज जोशी श्रीक्षेत्र नवगण राजुरी यांचे कीर्तन होईल सोमवार दिनांक १७ जून २०२४ रोजी प्रेम मूर्ती मठाधिपती महंत श्री ह भ प शिवाजी महाराज श्रीक्षेत्र नारायण गड यांचे कीर्तन होईल मंगळवार दिनांक १८ जून २०२४ रोजी व्याकरणाचार्य श्री ह भ प अर्जुन महाराज लाड गुरुजी श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था श्रीक्षेत्र होळ यांचे कीर्तन होईल बुधवार दिनांक १९ जून २०२४ रोजी भागवताचार्य ह भ प पद्माकर महाराज देशमुख अमरावती यांचे कीर्तन होईल गुरुवार दिनांक २० जून २०२४ रोजी ज्ञान

सिंधू श्री ह भ प संदीपान महाराज शिंदे हासेगावकर अध्यक्ष श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था श्रीक्षेत्र आळंदी यांचे कीर्तन होईल शुक्रवार दिनांक २१ जून २०२४ रोजी वटपौर्णिमा या दिवशी वारकरी संप्रदाय भूषण रामायणाचार्य श्री ह.भ.प रामरावजी महाराज ढोक नागपूरकर यांचे काल्याचे किर्तन होईल वेळ सकाळी दहा ते बारा त्यानंतर महाप्रसाद व महापंक्ती होते या सोहळ्यास महाराष्ट्रातील ख्यात कीर्तन दिग्गज गायनाचार्य व वादनाचार्य यांची सेवा लाभणार आहे.

### ओमराज पौळचे नीट

तालुक्यातील सुशी येथील रहिवासी व श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आहेर चिंचोली येथे कार्यरत असलेले प्राध्यापक धर्मराज पौळ यांचे चिरंजीव ओमराज धर्मराज पौळ याने नुकत्याच झालेल्या २०२४ नीट परीक्षेत ७२० पैकी ६८६ गुण घेवून घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, एमबीबीएस या कोर्ससाठी तो पात्र ठरल्याने त्यास पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### सोशल मीडियावर फेक

बिघडवण्याच्या उद्देशाने ईन्स्टाग्राम या समाज माध्यमावर प्रसारीत केली. म्हणुन_१७१७ अशी बनावट आयडी बनवुन वापरत असलेल्या वापरकर्त्याविरुध्द पोलीस स्टेशन परळी शहर येथे गणपती उगले यांच्या फिर्यादीवरून गुन्हा रजि. नंबर ८५/२०२४ कलम ५०५(२), ५०० भादवी सह कलम ६६ (क) माहिती तंत्रज्ञान कायदानव्ये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास पोलीस करीत आहेत.

### बीडचा विजयोत्सव करताना

मोठेपणा दाखवला आणि विजयोत्सव साजरा करण्याचा मान जिल्हावासीयांना मिळाला, लोकनेते स्व.विनायक मेटे साहेबांच्या अकाली जाण्याने पर्वताएवढे दुःख, संघर्ष पाठीशी असताना आणि ताईंनी लोकसभा लढावी यासाठी अनेकांनी देव पाण्यात ठेवलेले असताना केवळ आणि केवळ सामाजिक भावनेचा व समाजहिताचा आदर करून ताईंनी माघार घेतली, माघार घेताना मनातल्या वेदना आणि डोळ्यातल्या ओलसर पापण्यांचे बीड जिल्हा साक्षीदार आहे. बीडचा विजयोत्सव साजरा करताना या माऊलीने सामाजिक अस्मितेसाठी केलेला त्याग नजरेआड होता कामा नये, हा त्याग अनमोल आहे, म्हणून खऱ्या अर्थाने या माऊलीच्या त्यागाची सव्याज परतफेड करण्याची जबाबदारी आता समाजाची आहे. स्व.मेटे साहेबांचं स्वप्न आज पुर्ण झालं शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना बहूजन समाजाने परिवर्तनाचा वारसा जपत खासदार केले आहे असे ज्ञानेश्वर चौधरी यांनी सांगितले.

## माधव मुंडे यांना राज्यस्तरीय शैक्षणिक गरूडझेप पुरस्कार २०२४ ने सन्मानित

परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे स सरचिटणीस तथा दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान हाळम चे संस्थापक अध्यक्ष युवा नेते माधव मुंडे यांना सन्मानित करण्यात आले

ईगल फौंडेशन संस्थेचे २०२४ चे पुरस्कार वितरण उत्साहात

युवा नेते माधव मुंडे यांनी अठरा वर्षापासून हाळम फेस्टिव्हल च्या माध्यमातून व राजकीय कार्यासह आणि गेल्या चार वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात भरीव अस काम केलं आहे. ते सामाजिक कार्यासह आरोग्य, समाजप्रबोधन, आध्यात्मिक, जनजागृती,उद्योग आदी क्षेत्रात त्यांचा काम करण्याचा हातखंडा आहे.बेरोजगारांना त्यांच्या हाताला रोजगार उपलब्ध करण्यासाठी धडपड करतात.याकामी ना.धनंजयजी मुंडे साहेबाचे सहकार्य मिळते अशे ते सतत सांगतात. डॉ.अण्णासाहेब डांगे शैक्षणिक संकुल आष्टा येथे ९ जून २०२४ रोजी गौरव सोहळा संपन्न



सन २०२४ चे ईगल फौंडेशनचे पुरस्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. त्यामध्ये महाराष्ट्रा राज्य विधान परिषदेत मा.आ रामहरी रूपनवर साहेब,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर चे सहाय्यक कुलसचिव डॉ.शिवाजी नारायणराव शिंदे, समाजकल्याण आयुक्तालय पुणे च्या उपसंचालक श्रीमती निशादेवी संभाजी बंडगर (वाघमोडे), दै.स्वराज्य तोरण चे संपादक डॉ.किशोर पाटील,श्री गणेश आखाडा भाईंदरचे वस्ताद श्री वसंतराव पाटील ,दै.तरुण भारतचे आष्टा येथील पत्रकार सुनिल एकनाथ पाटील,कोल्हापूर येथील पत्रकार श्री अमोल पांढरे (इलेक्ट्रॉनिक मिडिया), पत्रकार श्री बाळासाहेब कोळेकर (इलेक्ट्रॉनिक मिडिया),श्री अविनाश रामचंद्र गायकवाड,आर.एस.पी. ऑफीसर डॉ.मनिलाल रतिलाल शिंपी, डॉ.मीना प्रमेंद्र श्रीवास्तव, दै.महासत्ता चे शिराळा प्रतिनिधी श्री विनायक गायकवाड, सौ.अर्चना सुरेश पाटील ,मुंबई हायकोर्ट वकील संघटनेचे उपाध्यक्ष ॲड विकास कोळेकर ,प्रा.डॉ.जयसिंग होनाजी गाडेकर, श्री माधव मंचकराव मुंडे ,श्री रामराजे फड खादगांवकर , श्री संजय वाघमोडे, श्री तानाजी मारुती पाटील, संध्या अंकुश जानकर, सौ.पल्लवी वढवेकर बर्वे ,गंधारधून.. संस्था , श्री सुनील यशवंत हळदणकर, श्री सुरेश केसरकर , श्री प्रशांत पुजारी वाडीकर, श्री निलेश बाळाराम पाटील, श्री विक्रम राजाराम धुमाळ,श्री बापू पांडुरंग जेधे ,श्री बबनराव गंगाराम धायगुडे ,सौ.भारती औटी ,श्री बाळा यशवंत साठे,माधुरी अनिल पाटील ,श्रीमती सुनंदा मधुकर वायदंडे ,श्री संदीप हणमंत कुंभार यांना सन्मानचिन्ह, मानपत्र देवून गौरविण्यात आले. सदर सोहळा रविवार दि.९ जून २०२४ रोजी आष्टा येथील मा.डॉ.अण्णासाहेब डांगे शैक्षणिक संकुल सभागृह आष्टा ता.वाळवा जि.सांगली येथे पार पडला.सदर सोहोळ्यासाठी अनेक वृत्तपत्राचे संपादक , इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे विशेष प्रतिनिधी, पत्रकार, व मान्यवर उपस्थित होते आणि यावेळी माधव मुंडे यांचा सर्व परिवार उपस्थित होता.

## अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवतकथा व भव्य कीर्तन महोत्सवाचे परळीत आयोजन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

२१ व्या शतकातील महान संत प.पू.गुरूवर्य श्री ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त आडत व्यापारी, खरेदीदार व्यापारी व अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या संयुकत विद्यमाने शनिवार दिनांक १५ जुन ते २१ जुन रोजी परळी वैजनाथ येथील मोंढा येथील श्री संकटमोचन हनुमान मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद भागवत कथा व भव्य दिव्य कीर्तन महोत्सव सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दिनांक १५ जुन पासून परळी वैजनाथ येथे ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवतकथा व कीर्तन महोत्सवाचे परळीत आयोजन करण्यात आले असून दैनंदिन कार्यक्रम पहाटे ५ ते ७ वा. सुंदरकांड, १२ ते २ वा. महिला भजनी मंडळ व दुपारी ३ ते ६ वा. भागवत कथा होणार असून सायंकाळी ७ ते ९ वा. हरिकीर्तन होणार आहे. कन्हैय्या अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थचे अध्यक्ष भागवताचार्य ह.भ.प.गोविंद महाराज मुंडे हे आपल्या रसाळ व ओजस्वी वाणीतून कथा श्रवण करणार आहेत. त्यांना जनक ह.भ.प. जनक महााज कदम, ह.भ.प.राजेभाऊ महाराज आंधळे, ह.भ.प.रूक्षराज महाराज आंधळे, ह.भ.प.मोहन मुंडे, ह.भ.प.ऋषीकेश होळंबे हे कथा साथ संगत देणार असून ह.भ.प.अशोक महाराज कराळे, ह.भ.प.करणकुमार मुंडे, ह.भ.प.माधव महाराज उखळीकर हे तबला साथ देणार आहेत. शनिवार दिनांक १५ जुन पासून दररोज रात्री ७ ते ९ वा. विनोदाचार्य ह.भ.प.माणिक महाराज रेंगे, रविवार दिनांक १६ जुन रोजी विनोद सम्राट ह.भ.प.प्रकाश महाराज साठे, सोमवार दिनांक १७ जुन रोजी भागवताचार्य ह.भ.प.नामदेव महााज फपाळ, मंगळवार दिनांक १८ जुन रोजी बालकीर्तनकार ह.भ.प.जनाई महाराज कोकाटे संगमकर, बुधवार दिनांक १९ जुन रोजी ह.भ.प.गणेशानंदजी महाराज शास्त्री भगवतीकर, गुरूवार दिनांक २० जुन रोजी विनोदाचार्य ह.भ.प.भरत महाराज जोगी यांचे हरिकीर्तन होईल. तसेच २१ जुन रोजी ह.भ.प.तुकाराम महाराज शास्त्री यांचे सकाळी ११ ते १ वा.काल्याचे किर्तन होणार असून तद्नंतर लगेच कृ.उ.बा.स.सभापती सुर्यभान नाना मुंडे यांच्या वतीने महाप्रसाद होईल कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

## धारुर शहरात महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात साजरी

**किल्ले धारुर । प्रतिनिधी**

धारूर शहरात महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात उत्साहात साजरी करण्यात आली सजवलेल्या रथात प्रतीमा ठेवून विवीध प्रात्यक्षीके सादर करत वाजता गाजर मुख्यरस्त्याने हि मिरवणुक काढण्यात आली.उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

धारुर शोहरत महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात व विवीध कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली.जयंती निमीत्त महाराणा प्रतापसिंह चौकात सजावट करून भगव्या ध्वजारोहण करण्यात आले प्रतीमा पुजन करण्यात आले .शहरात मुख्यरस्त्याने



सजवलेल्या रथातून महाराणा प्रतापसिंह यांचे प्रतिमेची वाजता गाजर भव्य मिरवणूक काढण्यात आली छत्रपती शिवाजी महाराज चौकात मान्यवराचे हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले.यावेळी जयप्रकाश तोष्णीवाल, अमोल नेहरकर आनंद धाट डॉ स्वरुपसिंह हजारी उदयसिंह दिख्खत तहसीलदार जिवककुमार कांबळे,नायब तहसीलदार नजीर कुरेशी ,माधवराव निर्मळ,सुधिर शिनगारे, शेषेराव फावडे आनंदसिंह दिख्खत आदी मान्यवरा सह समाजबांधव उपस्तिथि होते.शहरात मुख्यरस्तत्याने विवीध प्रात्यक्षीके दाखवत महाराणा प्रतापसिंह यांचा जयजय कार करत हि मिरवणूक काढण्यात आली उत्सव समितीचे कार्य करते समाजबांधव मोठया संख्येने सहभागी झाले होते.

## राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार ह.भ.प.राधिकाताई खेमनर यांना प्रधान

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी.येथे दिशा शक्ती मीडिया समूह च्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

आपण अध्यात्मिक व इतर क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल तसेच आपण आपले बुद्धी कौशल्य व भारतीय राज्यघटनेतील लोकशाही समाजवाद धर्मनिरपेक्ष जनसेवा राष्ट्रीय जोपासून सामाजिक समता दृढ करून निकोप संवर्धन. व आपण अध्यात्माची सत्याची कास धरून एक सामान्य महिला समाजपयोगी



राबणारी व समाजामध्ये वावर असणारी अशी ओळख कायम ठेवली अशाप्रकारे जनसेवेचे व्रत घेतलेल्या लोकांच्या कार्याला बळकट आणि बलशाली करण्याच्या उदात्त हेतूनेच दिशाशक्ती मीडिया समूह तर्फे समाजभूषण पुरस्कार प्रदान..... दिल्याबद्दल आणि हातून घडत असलेले सामाजिक कार्य या कर्तुत्वामुळे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

cmyk

# कोथिंबीर, कांदापातीने गाठली शंभरी

## नाशिकच्या बाजार समितीत आवक घटल्याने भाज्या महागल्या

मान्सूनपूर्व शेती कामांना आता सुरुवात झाली आहे. शेती कामांमध्ये शेतकरी व्यस्त झाल्याचं पाहायला मिळत आहे. तर नाशिकच्या बाजार समित्यांमध्ये फळभाज्या आणि पालेभाज्यांची आवक घटल्याने भाजीपाल्यांच्या दरात देखील मोठी वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या महिनाभरापासून सातत्याने भाज्यांची दरवाढ सुरू आहे. कोथिंबीर, कांदापातीने शंभरी आहे. कोथिंबीर ७० ते १००, तर कांदापातीचे दर गगनाला भिडले आहेत. कांदापातीचे दर ३० ते ९० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. हिरवी मिरची, वालपापडी, घेवडा, दोडके, गिलके, कारले आदी भाज्यांच्याही दरातही मोठी वाढ झाली आहे.

उत्पादनात घट झाल्याने भाववाढ : कडाक्याचा उन्हाळा आणि नाशिक जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती पिकांवर परिणाम झाला आहे. त्यामुळे फळभाज्या आणि पालेभाज्यांमध्ये दरात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांचे उन्हामुळे आणि अवकाळीमुळे नुकसान झाले आहे.



त्यामुळे आता उत्पादनात घट झाल्याने भाववाढ झाल्याची प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली आहे.

नाशिक जिल्ह्याला पावसाने झोडपले : नाशिक जिल्ह्यात काल दुपारपासून रात्री उशिरापर्यंत मेघगर्जनेसह जोरदार पावसाने हजेरी लावली. चांदवड शहरासह तालूक्यात मुसळधार पाऊस झाला असून चांदवड शहरातील सोमवार पेठ भागात रस्त्यांवरुन नदीच्या स्वरूपात पाणी वाहत होते. मनमाड शहरात सुमारे तासभर सुरु असलेल्या या मुसळधार पावसाने शहरात सर्वत्र पाणीच पाणी झाले. नांदगाव शहर व परिसरातही पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकरी सुखावला असून शेतात पाणी साचले. देवळा तालुक्यातील उमराणे येथे वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू असताना कांद्याच्या शेडमध्ये निवाऱ्यासाठी थांबलेल्या एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. दोघे पिता पुत्र पावसामुळे या शेडमध्ये निवाऱ्यासाठी थांबलेले असताना शेड कोसळले त्यात मुलाचा जागीच मृत्यू झाला. देविदास भाऊराव अहिरे असे या मृत मुलाचे नाव आहे. तर दुसऱ्या घटनेत तिसगाव येथील इंदिरानगर परिसरात वीज कोसळल्याने एक बैल व आकाश देवरे नामक २० वर्षीय तरुणाचा देखील मृत्यू झाला आहे.

## ‘चारा डेपो’ सुरू करण्याचा राज्य शासनाचा निर्णय!

राज्यात १५ जुलैपर्यंत पुरेल एवढाच चारा सध्या राज्यात शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने एक मोठा निर्णय घेतलेला आहे. राज्यात दुष्काळ जाहीर केलेल्या ४० तालुक्यांतील पशुधन वाचविण्यासाठी तातडीने चारा डेपो सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. हे चारा डेपो ३१ ऑगस्ट पर्यंत सुरू राहतील.

दुष्काळी भागात तातडीने चारा, पाणी व अन्य सोयीसुविधा उपलब्ध करून जनतेला दिलासा देण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी घेतलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत प्रशासनास दिले होते.

पशुधनाची संख्या, चारा टंचाईची तीव्रता, पशु संवर्धन विभागाचा अहवाल विचारात घेऊन चारा डेपोसाठी गावे निश्चित केली जाणार आहेत. स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन गावांची संख्या कमी अधिक करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या डेपोचे संचालन सहकारी संस्था, कृषी उत्पन्न बाजार समित्या, दूध खरेदी-विक्री संघ, इतर सेवाभावी संस्था, तसेच चारा छावण्या ज्या संस्था मार्फत चालवल्या जातात त्यांनाच डेपो चालवण्यास देण्यात येणार आहेत. चाऱ्याचे नुकसान झाल्यास ती रक्कम जिल्हाधिकाऱ्यांनी डेपो चालकांकडून वसूल करावी, असा या निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

### राज्यात ५१२ टन हिरवा चारा

सध्या राज्यात ५१२.५८ टन हिरवा चारा उपलब्ध असल्याचा अहवाल पशुसंवर्धन विभागाने दिला आहे. पशुधनाचा विचार करता हा चारा १५ जुलैपर्यंत पुरेल असे विभागाचे म्हणणे आहे. तसेच १४४.४५ टन वाळलेला चारा उपलब्ध असून, तो ३० जूनपर्यंत पुरेल. तरीही दुष्काळी परिस्थिती विचारात घेता काही भागात चारा टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे चारा डेपो सुरू करण्यात येणार आहेत.



# महागाईला लसणाची फोडणी, गेल्यावर्षीपेक्षा भाव आता दुप्पट



### ग्राहकांच्या खिशाला बसणार झळ

गेल्यावर्षीच्या अखेरीस लसणाने दरवाढीत मोठी झेप घेतली होती. टोमॅटो, कांदा आणि बटाट्यांनी गेले वर्ष गाजवले होते. गेल्यावर्षी ऑगस्टमध्ये तर दरवाढीचा भडका उडाला होता. त्यानंतर लसणाने मोठी घौडदौड केल्याने ग्राहकांच्या तोंडचे पाणी पळवले होते. आता पावसाळ्याच्या तोंडावर लसणाने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. महागाईला लसणाची फोडणी बसली आहे. नवी मुंबईतील बाजार समितीमध्ये ८५ ते २१० रुपये किलो भाव आहे. गेल्या वर्षअखेरीस लसूणच्या दरवाढीचा विक्रम झाला होता. यावर्षीही हंगामाच्या सुरुवातीपासूनच दर वाढ होण्यास सुरुवात झाली आहे.

गेल्यावर्षीपेक्षा भाव दुप्पट

गतवर्षी जूनच्या सुरुवातीला बाजार समितीमध्ये लसूण ४० ते ६५ रुपये किलो दराने विकला जात होता. यावर्षी हेच दर ८५ ते २१० रूपयांवर पोहचले आहेत. किरकोळ मार्केटमध्ये २८० ते ३०० रुपये किलो दराने लसूणची विक्री होत आहे. प्रत्येक वर्षी जानेवारीमध्ये लसूणचा हंगाम सुरू होतो. जूनपर्यंत लसणाचे दर घसरत असतात. परंतु यावर्षी हंगामाच्या सुरूवातीपासूनच लसूण तेजीत आहे. राज्यातील सर्वच बाजार समितीमध्ये ८० ते २३० रुपये किलोपर्यंत दर आहे. मुंबई बाजार समितीमध्येही गतवर्षीच्या जून महिन्यापेक्षा बाजारभाव दुप्पट झाले आहेत. लसूणचे उत्पादन कमी झाले असल्यामुळे हा फरक पडला आहे. दिवाळीदरम्यान काही प्रमाणात दर कमी होतील असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्यातच आता इतर भाजीपाला महागल्यास ग्राहकांच्या खिशाला मोठी कात्री लागू शकते. केंद्र सरकारला याविषयी लवकर पाऊलं टाकावी लागणार आहे. देशात महागाईचा आलेख चढाच राहिला आहे. केंद्र सरकारने वेळोवेळी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. पण लहरी हवामानाने सरकारच्या प्रयत्नांवर पाणी फेरले आहे.

डिसेंबरमध्ये ४०० रुपयांचा भाव

डिसेंबर २०२३ मध्ये लसणाने मोठा भाव खाल्ला होता. प्रतिकूल हवामान आणि अवकाळी पावसाचा मोठा फटका त्यावेळी बसला होता. दिवाळीनंतर लसणाचा भाव २००-२५० किलोच्या घरात होता. डिसेंबर महिन्यात हा भाव ३५०-४०० रुपये किलोंच्या घरात पोहचला होता. त्यानंतर या जानेवारीत आवक वाढल्यानंतर या किंमती कमी झाल्या होत्या. आता पावसाळ्याच्या तोंडावर पुन्हा एकदा किंमतींनी हिसका दाखवला आहे.

# सोयाबीनला बाजारात ४ हजाराचा भाव, पण सोयाबीन बियाण्याची विक्री १० हजाराला

हिंगोली : राज्यात मान्सूनचे आगमन झाल्यामुळे बळीराजा सुखावला असून आता सर्वांनाच पावसाची प्रतिक्षा आहे. तर, दुसरीकडे शेतकरी आता पेरणीच्या कामात व्यस्त होणार असून पहिल्या पावसानंतर पेरणीला सुरुवातही होईल. त्यामुळे, बियाणांची खरेदी करण्यासाठी बळीराजा बी-बीयाणं , खतांच्या दुकानात पाहायला मिळत आहे. मात्र, बियाणांची वाढलेली किंमत पाहून शेतकरी निराश झाल्याचं दिसून येत आहे. लोकसभा निवडणुकांत मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात चर्चेत ठरलेला सोयाबीन शेतकऱ्यांचा प्रश्न अद्यापही कायम आहे. हिंगोली जिल्ह्यांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणामध्ये सोयाबीनची लागवड केली जाते गेल्या वर्षी सुद्धा मोठ्या प्रमाणात सोयाबीनची लागवड करण्यात आली होती. त्यामुळे, शेतकऱ्यांनी शेतामध्ये चांगल्या पद्धतीने सोयाबीनचे उत्पादन घेतले होते, परंतु बाजार भाव नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी शेतामधलं सोयाबीन घरीच ठेवलं होतं. वर्षभर सोयाबीनचा भाव पाच हजारांच्या पुढे कधीच गेला नाही, सध्या हे सोयाबीन चार ते साडेचार रुपये दराने विक्री होत आहे, आता पेरणीची वेळ आली तरही सोयाबीनचा भाव





वाढला नसल्याने शेतकरी चिंतातूर आहे. तर, नव्या पेरणीसाठी सोयाबीन बियाणाने चांगलाच भाव खाल्ल्याचं दिसून येत आहे.

शेतकऱ्यांनी शेतामध्ये मशागतीची कामे पूर्ण करून ठेवली आहेत आणि पावसाची वेळ जवळ आल्याने बाजारामध्ये बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी वाढू लागली आहे. परंतु सोयाबीनच्या बियाण्याचे भाव प्रचंड वाढल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. गेल्या वर्षीच्या सोयाबीनला ४ हजार रुपये पर क्विंटल भाव मिळतोय, तर सोयाबीनचे बियाणे सात ते दहा हजार रुपये पर क्विंटल दराने खरेदी करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. त्यामुळे एकीकडे शेतमालाला भाव मिळत नाही आणि दुसरीकडे बियाण्याचे भाव वाढल्याने शेतात सोयाबीनची पेरणी कशी करायची असाच प्रश्न शेतकऱ्यासमोर निर्माण झाला आहे.

सोयाबिन पेरणीची पद्धत

सोयाबीनसाठी वापरला जाणारा बियाणे दर हा राखल्या जाणाऱ्या अंतरानुसार सरासरी १६ किग्रॅ २० किग्रॅ/एकर असतो. दोन रांगांतील अंतर: ४५ ते ६० सेमी तर रोपांतील अंतर: ४-५ सेमी एवढे ठेवण्यात येते. सोयाबीनला चांगला गादीवाफा लागतो ज्याचा पोत बऱ्यापैकी चांगला असेल आणि त्यामध्ये खूप जास्त ढेकळे नसतील. जमीन योग्य सपाट केलेली आणि पेंढा नसलेली असावी. कुळवाच्या नांगराने एकदा खोल नांगरणी करून त्यानंतर स्थानिक नांगराने दोनदा कुळवणी किंवा दोनदा नांगरणी पुरेशी असते. पेरणीच्यावेळी मातीमध्ये चांगला ओलावा असावा लागतो.

वालुकामय चिकणमाती चांगली

सोयाबीनची वाढ उष्ण आणि दमट हवामानात चांगली होते. सोयाबीनच्या जातींमध्ये दिवसांची लांबी हा प्रमुख घटक आहे. कारण या कमी दिवसांच्या वनस्पती आहेत. सोयाबीनला चांगला निचरा असलेली सुपीक जमीन लागते जिचा सामू मात्रा ६.० ७.५ असेल. मातीचा उत्तम प्रकार म्हणजे वालुकामय चिकणमाती, जिच्यामध्ये सेंद्रिय घटक चांगले असतील. पाणी साठून राहणारी माती सोयाबीन लागवडीसाठी अनुरूप नाही.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजीमहाराजांनी राजा जयसिंगची भेट घेऊन त्यांच्याबरोबर सलोख्याची बोलणी करण्यासाठी त्याच्या शिबिरामध्ये प्रवेश केला.
१७७६ : अमेरिका देशाला स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी घोषणापत्र तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली.
१८६६ : अलाहाबाद उच्च न्यायालयाची स्थापना.
१८९५ : पॅरिस-बॉर्डोक्स-पॅरिस ही इतिहासातील पहिली ऑटोमोबाईल रेस किंवा पहिली मोटर रेस झाली.
१९०१ : न्यूझीलंडने कूक बेटे बळकावली.
१९०७ : नॉर्धनम्प्टनशायर क्रिकेट संघ १२ धावांत सर्वबाद.
१९२१ : ब्राझील देशांतील महिलांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला.
१९३५ : एडविन आर्मस्ट्रॉंगने पहिल्यांदा एफ.एम. लहरींचे प्रसारण केले.
१९३७ : जोसेफ स्टालिनने आपल्याच ८ लष्करी अधिकार्यांना ठार केले.
१९५५ : जगातील पहिल्या मैग्नेशियम जेट विमानाने भरारी घेतली.
१९६४ : पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थ्या संपूर्ण देशभर विसर्जित करण्यात आल्या.
१९७० : ॲनामे हेस, एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन या अमेरिकन सैन्यातील पहिल्या स्त्री जनरल झाल्या.
१९७२ : दारू पिउन रेल्वे चालवल्यामुळे एल्थाम वेल हॉल येथे रेल्वे अपघात होऊन ६ जण ठार व १२६ जण जखमी झाले.
१९९७ : सुखोई-३०के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.
१९९८ : कॉम्पॅक कॉम्पुटर कंपनी ने डिजिटल एक्विपमेंट कॉर्पोरेशन विकत घेण्यासाठी ९ अब्ज अमेरिकी डॉलर मध्ये इतिहासातील सर्वात मोठा सौदा केला.
१९८७ : १६० वर्षांच्या कालखंडात ब्रिटीश देशाच्या पंतप्रधान पदावर सलग तिसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर या पहिल्या ब्रिटीश नागरिक ठरल्या.
२००४ : कॅसिनी-हायगेन्स अंतराळयान शनिचा उपग्रह फीबी जवळून गेले.
२००७ : बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.
२००८ : भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीन वाजेद यांची सुटका करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : भारतीय-श्रीलंकन छायाचित्रकार जुलिया मार्गारेट कॅमेरॉन यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८७९)
१८८० : अमेरिकेचे पहिले संसद सदस्य रैफिन यांचा जन्मदिन.
१८९४ : टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोडा यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९५२)
१८९७ : क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९०९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राजकारणी तसचं, निट्टे एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक के.एस. हेगडे यांचा जन्मदिन.
१९२४ : साली भारतीय व्यंगचित्रकार, पत्रकार आणि लेखक अत्तूपुरथू मॅथ्यू अब्राहम उर्फ अबू अब्राहम यांचा जन्मदिन.
१९३७ : साली पद्मभूषण व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नर्तक, नृत्यदिग्दर्शक आणि शैक्षणिक तसचं, नालंदा नृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापक-दिग्दर्शिका आणि मुंबईतील नालंदा नृत्य कला महाविद्यालयाच्या संस्थापक-प्राचार्या कनक रेले यांचा जन्मदिन.
१९४२ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय उत्प्रेरक वैज्ञानिक, आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे माजी संचालक पॉल रत्नसामी यांचा जन्मदिन.
१९४८ : बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा जन्म.
१९८२ : टंबलर चे सहसंस्थापक मार्को आर्मेंट यांचा जन्म.
१९८९ : भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी गिरीशचंद्र जोशी यांचा जन्मदिन.
१९९० : साली अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय हॉकी पटू सविता पुनिया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

३२३ई.पुर्व : मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट यांचे निधन. (जन्म: २० जुलै ख्रिस्त पूर्व ३५६)
१७२७ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचे निधन. (जन्म: २८ मे १६६०)
१९०३ : सर्बियाचा अलेक्झांडर (पहिला) यांची सर्बियन पत्नी ड्रगा माशिन यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८६४)
१९२४ : इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी वासुदेव वामन तथा वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८५८)
१९५० : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी भाषिक लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसेनानी तसचं, भारतीय राष्ट्रीय शिक्षक म्हणून ओळखले लोकप्रिय असणारे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचे निधन.
१९८३ : घन:श्याम बिर्ला, भारतीय उद्योगपती. (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९७ : भारतीय सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय दूर अंतरीय जलतरणपटू आणि व्यावसायिक तसचं, इग्लिश खाडी पार करणारे पहिले भारतीय नागरिक मिहीर सेन यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९३०)
२००० : राजेश पायलट, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री. (जन्म: १० फेब्रुवारी १९४५)

# कृषी विभागातील रिक्त पदांची भरती करा

## जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक पदच रिक्त बोगस बियाणे,खतांचा काळाबाजार रोखणार कसा

बीड । प्रतिनिधी

सध्या खरीप २०२४ हंगाम सुरू झाला असुन या हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणात बियाणे,खते व औषधी खरेदी करतात.मात्र काही कृषी दुकानदारांकडुन खत , बियाणे यांची कृत्रिम टंचाई करून चढ्या भावाने विक्री करत शेतकऱ्यांची आर्थिक लुट सुरू असुन त्यांच्यावर कारवाईची मागणी होत असताना खते, बियाणे,किडनाशके निर्मितीचे आणि विक्रीचे वितरण तसेच कारवाई करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक पदच रिक्त असुन खते बियाण्यांचा काळाबाजार रोखणार कसा?? असा प्रश्न पडला असुन बीड जिल्हा कृषी विभागातील जिल्हा गुण नियंत्रक निरीक्षक पदासह ईतर जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी ,२उप संचालक तसेच ३ उपविभागीय कृषी अधिकारी आणि परळी, अंबेजोगाई येथील तालुका कृषी अधिकारी पदे रिक्त असल्याने शेतकऱ्यांची हेळसांड होत असुन तातडीने रिक्त पदे भरण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे ,शेख युनुस,सूदाम तांदळे,शेख मुबीन, रामनाथ खोड यांनी बाबासाहेब जेजुरीकर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड, शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत कृषीमंत्री धनंजय मुंडे, सचिव कृषी विभाग, आयुक्त (कृषी), विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.




खते, बियाणे,किडनाशके निर्मितीचे आणि विक्रीचे परवाने वितरण तसेच कारवाई साठी अत्यंत महत्त्वाचे जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक पद रिक्त आहे.उत्पादने कंपनी आणि कायदेशीर मानकांशी जुळतात याची खात्री करण्यापूर्वी, दरम्यान आणि नंतर उत्पादनांची तपासणी करण्याची जबाबदारी गुणवत्ता नियंत्रकाची आहे. सध्या खरीप २०२४ हंगाम सुरू झालेला आहे.या हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणात बियाणे,खते व नंतर औषधे खरेदी करतात.त्यांना उत्तम दर्जाचे खते, बियाणे व औषधे मुबलक आणि योग्य किंमतीत उपलब्ध व्हावे तसेच बियाणे,खतांचा तुटवडा भासू नये, विशेषतः निविष्ठा उद्योगांना परवाना देणे,परवाने रद्द करणे,धाडी टाकणे, कारवाई करणे किंवा केलेली कारवाई मागे घेणे यात मुख्य गुणवत्ता नियंत्रण आधिका-याचा प्रमुख सहभाग असतो.पोलिस खात्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या निरीक्षक पदाला असलेले महत्त्व गुणवत्ता नियंत्रण अधिकारी पदाला आहे.या उद्देशाने राज्यात गुणवत्ता नियंत्रण विभाग कार्यरत आहे.मात्र बीड कृषी विभागातील खते, बियाणे,किडनाशके निर्मितीचे आणि विक्रीचे परवाने वितरण तसेच कारवाई करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे मुख्य गुणवत्ता नियंत्रण आधिकारीपद पद रिक्त असुन

### कृषी विभागातील ६ मंजुर पदापैकी ६ पदे रिक्त

कृषी उपसंचालक , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड १ पद, उपविभागीय कृषी अधिकारी बीड , माजलगाव, अंबेजोगाई येथील प्रत्येकी १ पद आणि कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद बीड व प्रकल्प उप संचालक आत्मा कार्यालय बीड अशी एकूण ६ मंजुर पदापैकी ६ पदे रिक्त आहेत.

तातडीने भरण्यात यावे. कृषी विभाग जिल्हा परीषदेचा महत्वाचा विभाग असुन कृषी विभाग अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतात.शेतक-यांच्या सर्वांगीण विकासासाठी फळबाग लागवड, यांत्रिकीकरण, ठिंबक सिंचन,स्प्रिंकलर, मोफत बियाणे वाटप,माती परीक्षण आदि वैयक्तिक लाभाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्याचे काम कृषी विभागामार्फत करण्यात येते.शेतीविषयक वस्तुंची उदा.खते,बी - बियाणे, औजारे इत्यादींचा पुरवठा करणाऱ्या कृषीसेवा केंद्राला परवाना देण्याचे कार्य या विभागामार्फत करण्यात येते. मात्र जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी पद रिक्त असुन तातडीने भरण्यात यावे. महाराष्ट्र राज्य कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजयजी मुंडे यांच्या परळी मतदार संघातील तसेच अंबेजोगाई या दोन्ही ठिकाणी तालुका कृषी अधिकारी पदे रिक्त आहेत.शेतक-यांना विविध योजनांची माहिती देणे त्याचबरोबर शेतकऱ्यांमध्ये कृषी विस्तार किंवा कृषी संसाधने बाबत शेतकऱ्यांना योग्य माहिती पुरवणे तसेच शेतकऱ्यांसाठी विविध प्रशिक्षणाचे आयोजन करणे त्याच बरोबर शेतकऱ्यांचे विविध ठिकाणी मेळावे आयोजित करणे तालुका कृषी अधिकाऱ्यांचे काम असुन अत्यंत महत्त्वाचे म्हणजे अतिवृष्टी किंवा कोरडा दुष्काळ दरम्यान पंचनामे तयार करण्याचे काम महसूल विभागातील तलाठी आणि कृषी विभागातील कृषी सहायक करत असुन याची जबाबदारी तालुका कृषी अधिकाऱ्याची असते.मात्र परळी आणि अंबेजोगाई येथील तालुका कृषी अधिकारी पदे रिक्त असुन तातडीने भरण्यात यावीत. बीड जिल्ह्यातील कृषी विभागातील एकुण ४४ टक्के रिक्त पदे असल्याने मनुष्यबळ अभावी कृषी विभागातील कामे खोळंबली असुन त्यामुळे शेतकऱ्यांची हेळसांड होत असुन तातडीने रिक्त पदे भरण्यात यावीत यासाठी १५ आगस्ट २०२३ रोजी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांना प्रत्यक्ष निवेदन देण्यात आले होते.मात्र अद्याप रिक्त पदांची भरती करण्यात आलेली नाही.कृषीमंत्र्यांच्या जिल्ह्यातच कृषी विभागातील रिक्त पदे भरण्यास होत असलेला विलंब समाधानकारक नाही.

## तायक्वांदो खेळ युवक युवतींसाठी करिअर म्हणून उपयुक्त- डॉ.सारिका क्षीरसागर



### पवनसुत मंगल कार्यालय येथे तायक्वांदो प्रशिक्षण केंद्राचे उदघाटन

बीड । प्रतिनिधी

तायक्वांदो खेळात बीड जिल्ह्यात अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू घडले असुन हा खेळ स्वसंरक्षणासोबतच स्वयंशिस्त, एकाग्रता, काटकता व करिअरच्या दृष्टीने युवक युवतींसाठी खूप उपयुक्त असल्याचे डॉ. सारिका क्षीरसागर यांनी प्रशिक्षण केंद्राच्या उदघाटन प्रसंगी सांगितले.

बीड शहरातील नगर रोड परिसरात असलेल्या पवनसुत मंगल कार्यालयाच्या हॉलमध्ये तायक्वांदो असोसिएशन ऑफ बीड जिल्हा संघटनेच्या मान्यतेने चॅम्पियन तायक्वांदो अकॅडमीच्या नवीन शाखेचे उद्घाटन रविवारी डॉ. सारिका क्षीरसागर व ॲड. सर्जेराव तांदळे यांच्या हस्ते पार पडले. या उद्घाटन प्रसंगी चॅम्पियन्स तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी प्रात्यक्षिके सादर केली. ॲड. सर्जेराव तांदळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढून प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांची उपस्थिती लाभली. यावेळी बोलताना ॲड. तांदळे म्हणाले की , तायक्वांदो खेळासाठी डॉ.अविनाश बारगजे व जयश्री बारगजे हे दाम्पत्य जवळपास ३० वर्षांपासून काम करत असून या खेळामुळे अनेक खेळाडूंना सरकारी नोकऱ्या देखील मिळालेल्या आहेत. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सारिकाताई क्षीरसागर पुढे म्हणाल्या की, तायक्वांदो संघटनेचे कार्य मी जवळून अनुभवले असून संघटणा व खेळाडूंच्या प्रत्येक अडचणींसाठी आम्ही सदैव आपल्या पाठीशी आहोत. या खेळातील सातत्यपूर्ण सरावामुळे या खेळाडूंमध्ये शिस्तबद्धता, आत्मविश्वास, लवचिकता असलेले काटक निरोगी शरीर व चपळता दिसून येते. या परिसरात नवीन प्रशिक्षण केंद्राची आवश्यकता होतीच. नगर रोड भागातील, नवीन विकसित परिसरातील लहान मोठ्या खेळाडूंना हे प्रशिक्षण केंद्र अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असेही त्या यावेळी म्हणाल्या. तायक्वांदो संघटनेचे राज्य अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, महिला प्रशिक्षिका जया बारगजे, सेवानिवृत्त अभियंता दामोदर तांदळे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

१० वी बोर्ड परीक्षेत ९५ टक्क्याहून अधिक गुण मिळवलेले गुणवंत तायक्वांदो खेळाडू सृष्टी पवार, सृष्टी कौशल्ये, अभिषेक आमटे व ओंकार परदेशी या गुणवंतांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. गुणवंत राष्ट्रीय तसेच विद्यापीठ खेळाडू पारस गुरूखुदे , ऋत्विक तांदळे , देवेंद्र जोशी , सुदर्शन गायकवाड यांच्यासह राष्ट्रीय खेळाडू यशस्वी चव्हाण, श्रवण तांबारे , सार्थक भाकरे , कार्तिकी मिसाळ , सृष्टी योगे, राज्यपदक विजेते यश चव्हाण, प्रतीक्षा आमटे, कल्याणी घुगे, सार्थक ठेंगल ,स्वराज घोडके , आर्या शीर्षीकर आदी गुणवंत खेळाडूंचा यावेळी पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला ज्ञानेश्वर मिसाळ , जितेंद्र चव्हाण, सोमनाथ ढाकणे, पो कॉ शेख साहेब , हनुमान आमटे, ठेंगल साहेब, संतोष मोराळे यांच्यासह परिसरातील महिला व बाल खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बी बियाण्याच्या दरापेक्षा जास्त पैसे घेतल्यास रूमन्याचा दणका दाखवू-दत्ता वाकसे

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात जूनच्या पहिल्याच आठवड्यात वरून राजाने दमदार एन्ट्री मारल्यामुळे बळीराजा सुखावला आहे पावसाने उघडीप दिल्यास बळीराजा शेतातील कापूस तूर सोयाबीन बाजरी पिकाची लागवड व पेरणी करणार आहे त्यामुळे शेतकरी बी बियाणे खते खरेदी करीत आहे मात्र काही कृषी दुकानदाराकडून शेतकऱ्याकडून चढ्या भावाने पैसे घेतले जात आहेत असे झाल्यास शासनाच्या निर्धारित भावापेक्षा बी बियाण्याचे खताचे जास्त पैसे घेतल्यास आढळून आल्यास कृषी दुकानदारांना शेतकऱ्याच्या रूमन्याचा दणका दाखवून देऊ असे प्रसिद्धीपत्रक शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ता वाकसे यांनी दिले आहे

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात पुढे ते म्हणाले की बळीराजा हा अगोदरच गेल्या वर्षीच्या उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत झाल्यामुळे मेटाकुटीला आलेला आहे आणि आता कृषी दुकानदारांनी शेतकऱ्याकडून बी बियाणे खते औषधे याच्यावर शासन निर्धारित किमतीपेक्षा जास्त किंमत घेतल्यास शेतकऱ्यांनी तात्काळ कृषी विभाग यांच्याकडे तक्रार करावी त्याचबरोबर सोशल मीडियाच्या माध्यमातून त्या दुकानदाराची खते बी बियाणे खरेदी केलेली पावती प्रसारित करावी त्यामुळे होणारे फसवणूक थांबणार आहे सध्या पावसाने मोठ्या प्रमाणात बीड जिल्ह्यामध्ये दमदार एन्ट्री मारलेली आहे त्यामुळे बळीराजा मोठ्या प्रमाणात सुखावला आहे आणि बळीराजा खते बी बियाणे खरेदी करण्यासाठी कृषी दुकानदार यांच्याकडे जात आहे परंतु बीड जिल्ह्यात काही ठिकाणी शेतकऱ्याची लूट केली जात आहे ही लूट शेतकऱ्याची आम्ही कधीही खपवून घेणार नाही कृषी अधिकारी यांनीही कृषी दुकानदारावर वॉच ठेवला पाहिजे अन्यथा शेतकऱ्याला आर्थिक खर्चाला सामोरे जावा लागणार आहे त्यामुळे शेतकऱ्याचे जीवन मेटाकुटीला येऊ शकते अशा परिस्थितीचा विचार करून कृषी दुकानदारांनी शासन निर्धारित किमतीच्याद्वारे शेतकऱ्यांना बी बियाणे खते द्यावेत अन्यथा कुठलीही तफावत जिल्ह्यामध्ये आढळून आल्यास आम्ही शेतकऱ्याच्या शेतामध्ये असलेल्या अवताच्या रूमण्याचा दणका निश्चितपणे दाखवून देऊ सध्या शेतकरी एकमेव राजा आहे की त्याला लुटण्याचं काम बीड जिल्ह्यातील कृषी दुकानदार करत आहेत परंतु कृषी दुकानदारांना याचे परिणाम भोगावे लागतील शेतकऱ्याला त्रास दिल्यास आम्ही रस्त्यावर उतरू असेही आव्हान शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ता वाकसे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे

### लूट कराल तर याद राखा..!

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात कापूस सोयाबीन लागवड केली जाते त्यामुळे बीड जिल्ह्यातील अनेक कृषी दुकानदाराकडून मोठ्या प्रमाणात शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा जास्त भाव खते बी बियाणे यांच्या बॅगाचा काळाबाजार करून मोठ्या प्रमाणात लूट केली जाते परंतु आता आम्ही ही खपवून घेणार नाहीत जर का बीड जिल्ह्यातील शेतकऱ्याला असे काही समजले तर त्या शेतकऱ्यांनी तात्काळ माझ्याशी संपर्क करावा संपर्क नंबर ८३७८९८२१२१ यावर तत्काळ फोन करावा

## कामगाराचा सर्पदंशाने मृत्यू

चौसाळा । प्रतिनिधी



येथील आयडिया वडाफोन कंपनीमधील कामगाराचा सर्पदोष झाल्याने मृत्यू झाल्याची घटना ९ जून रोजी रात्री घडली सदर प्रकरणी माहिती अशी की चौसाळ्याच्या आयडिया टावर मधील कार्यरत कामगार भीमराव विष्णू कदम वय ३८ वर्ष राहणार पक्रुड तालुका भूम हा तरुण टावर मध्ये काम करत असताना दडून बसलेल्या सापाने त्याच्या पायाच्या करंगळीला दौश केला सदर तरुणाला तातडीने उपचारासाठी शासकीय रुग्णालय बीड येथे दाखल केले असता उपचार चालू असतानाच उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला त्याच्या मागे पत्नी एक मुलगी आई वडील चार बहिणी असा परिवार आहे सदर तरुण हा आई वडीलास एकुलता एकच मुलगा होता त्याच्या मृत्यूमुळे गावात हळहळ व्यक्त केली जाते त्याचा अंत्यविधी पखरुड गावी करण्यात आला अंत्यविधीला चौसाळा येथील त्याचे मित्र मंडळ व नातेवाईक बहुसंख्येने उपस्थित होते.

## वैद्यकीय सेवा ही इश्वरसेवेसमान-डॉ. सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

काही गोष्टी मिळवण्यासाठी कष्ट करावे लागतात, ईश्वराची सेवा घडण्यासाठी पुर्व पुण्याई लागते, तसेच वैद्यकीय सेवा करण्यासाठी, शिक्षण घेत असताना केलेला अभ्यास व कठोर परिश्रम यांची आवश्यकता असते, वैद्यकीय सेवा ही ईश्वर सेवा असून ही सेवा घडण्यासाठी भाग्यवान व्यक्ती लागतो, असे मत प्रसिद्ध न्युरॉलॉजीस्ट डॉ. रामदास सोळंके यांनी व्यक्त केले. ते जंगले हॉस्पिटल व आर्या क्लिनिकल लॅबच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रेयश देशपांडे हे होते, तर उदघाटन नगरसेवक दिपक मेंडके यांच्या हस्ते करण्यात आले. माजलगाव शहरातील कालिका नगर, कालिका मंदिराजवळ मोठेवाडी




येथील डॉ. रामेश्वर जंगले यांच्या नव्याने जंगले हॉस्पिटल व आर्या क्लिनिकल लॅबचा शुभारंभ करण्यात आला, या शुभारंभ प्रसंग संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ. रामदास सोळंके ( एम. डी. (मेडी.) डी. एम. न्युरॉलॉजी) हे प्रमुख पाहुणे होते.

अध्यक्षीय समारोपात डॉ. श्रेयस देशपांडे यांनी माणसाला मर्यादा असतात, पण प्रत्येक डॉक्टर हा आपला रुग्ण चांगला व्हावा, यासाठी प्रयत्न करत असतो, सामान्य लोक डॉक्टरांना देव समजतात, पण डॉक्टर हे देव नसतात, देव हा चुकत नाही, डॉक्टर प्रयत्न करतात ते यशस्वी होतील अथवा न होतील हे ईश्वराच्या हातात असते, असे त्यांनी अध्यक्षीय समारोपात सांगितले. या प्रसंगी डॉ.अविनाश गोले, डॉ. तुकाराम कुंभार,डॉ. शशांक कराळे, डॉ. किशोर भोपळे, डॉ. शंकर घोडके,डॉ.लक्ष्मण गोले, डॉ. बाबासाहेब खेत्री, विनायक रत्नपारखी,विजय साळवे, प्रा.आर.एस.यादव, शिवप्रसाद, खेत्री, सुर्यकांत खेत्री, विष्णु खेत्री, अविनाश गोंडे, विद्यासागर करपे,अंगद खेत्री, ग्रामसेवक रविंद्र पवार, जगन्नाथ खेत्री, दत्तात्रय चव्हाण, नरहरी खेत्री, ज्ञानेश्वर खेत्री,प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.अशोक खेत्री यांनी तर आभार डॉ. रामेश्वर जंगले यांनी मानले .यावेळी परिसरातील लोकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या दारी, खरीप हंगामाची जोरदार तयारी

### केएसके कृषि महाविद्यालयाचा उपक्रम

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी सलग्न सौ.के.एस.के.(काकू) कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथील विद्यार्थीनी ग्रामीण जागरुकता कार्यानुभव कार्यक्रम -२०२४ साठी राजुरी (नवगण) ता. जि. बीड येथे प्रत्यक्ष कृतीतून शेतकऱ्यांना आधूनिक तंत्रज्ञानाचे माहिती देणार आहेत. आजच्या घडीला भारतामध्ये शेती करणा-यांची संख्या सर्वाधिक आहे यामुळेच भारताला कृषीप्रधान देश म्हणून ओळखले जाते. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ न देता शेतीची उत्पादकता आणि उत्पादन वाढ करणे ही काळाची गरज आहे. शेतीसाठी विविध प्रकारची संशोधने आज होत आहेत व ही संशोधने सर्वसामान्य शेतक-यांपर्यंत पोहोचली तरच शेतीचा विकास होणे शक्य आहे. या अनुषंगाने सौ.के.एस.के.(काकू) कृषि महाविद्यालयाने राजुरी नवगण येथे कृषिकन्या प्रतिक्षा खोड, संध्या गवळी, ज्योती पवार, रुपाली करांडे, निकिता खोले, यशश्री पाटील, सृष्टी पोळके, आश्लेषा वाकडे आणि प्रज्ञा जावळे या कृषि कन्यांची निवड केली आहे.

या कृषी कन्या प्रत्यक्ष कृतीतून शेतकऱ्यांना बीजप्रकिया व त्याचे फायदे, माती परिक्षण का करावे, नवीन अवजाराची ओळख,



बियाण्यांच्या वेगवेगळया वर्गाचे व बियाण्यांच्या टॅग विषयी माहिती, पीक नियोजन व शेतीविषयक शासनाच्या विविध योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, ई- पीक पहाणी, निंबोळी अर्क, जीवामृत, ब्राह्मस्त्र, नीमास्त्र कसे बनवायचे, पाणी व्यवस्थापन, बीज उगवण क्षमता चाचणी, फळबाग तसेच विविध फळ झाडाचे कलमे यामध्ये गुटी कलम कसे करावे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेडनेट, नर्सरी, गांडूळखत, कंपोस्ट, यासोबतच गावातील शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक सर्व्हेक्षण केले जाणार आहे, त्यासोबतच कृषि विद्यापीठाच्या मोबाईल ऍप कोरडवाहू तंत्रज्ञान ऍप, कापूस लागवड तंत्रज्ञान ऍप बद्दल माहिती दिली जाणार आहे, बाजारात अचानक होणारी शेतमालाला मागणी व पुरवठा याचे तंत्र, शेतीमालाची विक्री करण्यासाठी ई-नाम मोबाईल ॲप संबंधी माहिती व वापर यासोबतच आधुनिक अवजारांचा अवलंब शेतीमध्ये होण्याबरोबरच कमी खर्चात जास्त उत्पादन देणारे वाण, नवीन कृषी पद्धती या सर्व गोष्टी ग्रामीण भागात पोहोचण्यासाठी काम करणार आहेत. ग्रामपंचायत परिसरात कृषी माहिती कट्टा तयार केला जाणार आहे. विविध सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रम तसेच विविध उपक्रम यामध्ये कृषि दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम व संवर्धन, आतंरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने प्रकृती स्वस्थासाठी कार्यक्रम, स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यसेनानीचे कार्य याबद्दल कार्यक्रमातुन माहिती दिली जाणार आहे. त्यासोबतच गावात स्वच्छता पंधरवडा आयोजित करुन गावकऱ्यांना स्वच्छतेचा संदेश दिला जाणार आहे. हे सर्व उपक्रम कृषि कन्या पुढील तीन महिन्यांमध्ये राजुरी (न.) गावात ग्रामीण जागरुकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत उपक्रम राबविणार आहेत. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे सहसचिव साळुंके, प्राचार्य डॉ मोरे, कार्यक्रम समन्वयक प्रा तायडे, विषयतज्ञ प्रा. बि.बि.तांबोळकर (उद्यानविद्या) प्रा.एस.व्ही.राठोड (कृषिशास्त्र), प्रा.डि.एस.जाधव( कृषि अर्थशास्त्र) प्रा.ए.पी. ढोरमारे (किटकशास्त्र), प्रा.एस.एस.राठोड ( वनस्पती शरीरशास्त्र), प्रा.के.डि. नागरगोजे (पशुविज्ञान व दुग्धशास्त्र), डॉ.के.एस.चौधरी (वनस्पती रोगशास्त्र), प्रा. ए.जि.गार्डी (मृदाविज्ञान) या कृषि कन्यांना प्रात्यक्षिकासाठी वेळोवेळी मदत व मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ. मंजुषा बनकर या महाविद्यालयाच्या कृषि कन्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले. यावेळी गावाच्या सरपंच, महाविद्यालयाचे प्राध्यापक, कृषि कन्या उपस्थित होत्या.

## एमआयएमच्या पाठपुराव्याने अडत मार्केट समोरील रोडच्या कामाला सुरुवात

बीड । प्रतिनिधी

अडत मार्केट समोरिल रोडची अवस्था बिकट स्वरूपाची झालेली होती येथील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर नाहक त्रास सहन करावा लागत होता यामुळे येथील रहिवाशी शेख सलमान एम आय एम युवा शहराध्यक्ष यांनी अनेक वेळा निवेदन देऊन, आंदोलन करून शासन दरबारी लोकांची व्यथा मांडली, गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असणारे अडत मार्केट समोरील रोडच्य कामाला आज एमआयएमच्या पाठपुराव्याने सुरूवात करण्यात आली आहे यामुळे स्थानिक नागरिकाकडून शेख सलमान यांचे आभार मानण्यात आले.

बीड शहरातील काकू नाना अडत मार्केट समोरील रोडची अवस्था खूप बिकट झाली होती या रोडवरून पायी चालणाऱ्या लोकांना नीट चालता येत नव्हता, या रोडवर धुळीचे साम्राज्य पसरलेले होते, पावसाळ्यात या रोडला जणू तलावाचे स्वरूपच मिळत होते,बाहेरगावावरून अडत मार्केटमध्ये माळवा घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत होता, तसेच या रोडवरून शाळेत जाणाऱ्या मुलांना देखील मोठ्या प्रमाणावर त्रास होत होता, या रोडवर महिलांचा वावर जास्त आहे,तसेच खासबाग देवी मंदिराला जाणाऱ्या लोकांना पण या रोडवरून आपला मार्ग काढून चालावा लागत होता, याचीच दखल घेत गेल्या पाच महिन्यापासून एमआयएमच्या वतीने शेख सलमान युवा शहराध्यक्ष हे पाठपुरावा करत होते. मुख्याधिकारी यांना अनेक वेळा निवेदन दिले, आंदोलने केली याची दखल घेत आज आडत मार्केट समोरील रोडच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली यामुळे येथील नागरिकांनी एमआयएम युवा शहराध्यक्ष शेख सलमान यांचे आभार मानले आहे.

### टीसी हरवला आहे

वरद गजानन सांळुके या नावाचा बारावी पासचा टीसी बसस्थानक परिसरात प्रवासादरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.
संपर्क
८६३७७०१८१६
७५८८१५०९७८

# कठोर मेहनत करून उज्वल भविष्य घडवा - चेतना तिडके

## वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने दिड हजार गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सध्याच्या वेगवान युगात उज्वल भविष्य घडविण्यासाठी कठोर मेहनत करा. उत्तुंग यश मिळविण्यासाठी प्रामाणिक मेहनतीशिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन अंबाजोगाईच्या अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी केले. वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आ. नमिता मुंदडा यांनी आयोजित केलेल्या गुणवंतांच्या गुणगौरव सोहळ्यात त्या बोलत होत्या.

रविवारी (दि.०९) अंबाजोगाईत वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने दहावी , बारावी, , , अबकास परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन करणाऱ्या केज विधानसभा मतदार संघातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरवाचा समारंभ





आयोजित करण्यात आला होता. अतिशय बारकाईने शोध घेऊन मतदार संघातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना सत्कारासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या समारंभात तब्बल दिड हजार गुणवंत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. राजकीय, प्रशासकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, भेटवस्तू देऊन या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक आणि सन्मान करण्यात आला. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपअधीक्षक चोरमले, तहसीलदार विलास तरंगे, प्राचार्य पंजाबराव खारकर, प्राचार्य कमलाकर कांबळे, प्रा. बाबू खडकभावी, प्रख्यात गझलकार मुकुंद राजपंखे, डॉ. नवनाथ घुगे, डॉ. श्रीनिवास रेड्डी, माजी उपनगराध्यक्ष शेख रहीम, प्रा. रोहिणी पाठक, डॉ. नितीन कांबळे, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष मकरंद पत्की, पत्रकार अविनाश मुडेगावकर, अभिजीत गाठाळ उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. नमिता मुंदडा यांनी सर्व गुणवंतांचे कौतुक केले. प्रत्येक वर्षी गुणवंतांची संख्या वाढत असल्याबद्दल विशेष आंनद व्यक्त करून त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी प्रोत्साहनप्र शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी देखील गुणवंतांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षय मुंदडा यांनी तर सूत्रसंचालन प्रकाश बोरगावकर यांनी केले. आभार ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांसोबतच पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

### विविध शाळांचाही सन्मान

मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा अभियान अंतर्गत यश प्राप्त करणाऱ्या केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील तीन जिल्हा परिषद शाळा आणि तीन खाजगी शाळांच्या मुख्याध्यापकांचाही या समारंभात विशेष सन्मान करण्यात आला.

### करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करणार : अक्षय मुंदडा

स्व.डॉ. विमलताई मुंदडा यांच्या संकल्पनेतून २००५ साली प्रतिष्ठानच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याची सुरुवात झाली. सुरुवातीला बोटावर मोजण्याएवढी असणारी गुणवंतांची संख्या आता हजारात पोहोचली असल्याचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी सांगितले. मतदार संघातील विद्यार्थी करिअरच्या योग्य वाटेने जावेत यासाठी आगामी काळात तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर आयोजित करणार असल्याचे मुंदडा यांनी सांगितले.

# सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन

किल्लेधारूर । प्रतिनिधी

शिरूर कासार येथे शनिवारी (ता.आठ) बंद दरम्यान काही जणांनी मराठा समाजाचे योद्धे जरांगे पाटील यांच्यावर अपमानजनक वक्तव्य केले होते. यामुळे मराठा समाजाच्या भावना दुखावल्या असून या समाजकंटकावर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी सोमवार (ता.१०) रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने येथील पोलिस ठाण्यात निवेदन दिले.


माघील काही दिवसांपासून सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणत आक्षेपार्ह पोष्ट शेअर केल्या जात आहेत यामुळे जातीय तेढ निर्माण होत असून या समाजकंठकावर तात्काळ गुन्हे दाखल करावे अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन देऊन करण्यात




आले.

निवेदनात असे म्हटले आहे की पंकजा मुंडे यांच्यावर आक्षेपार्ह पोष्ट केल्यामुळे शिरूर कासार येथे बंद ची हाक दिली होती,या दरम्यान सभेला बंदी असताना देखील या ठिकाणी मोठ्या संख्येने जमाव जमला होता या मध्ये काही जनांनी मराठा समाज व जरांगे पाटील यांच्यावर आक्षेपार्ह वक्तव्य केले होते.यामुळे सकल मराठा समाज तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत असून संबंधित लोकांविरोधात समाजात तेढ निर्माण करणे,मराठा समाजाला टार्गेट करून दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला प्रकरणी गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करा आशा आशयाचे निवेदन सकल मराठा समाज किल्लेधारूर यांच्या वतीने पोलीस स्टेशन यांना देण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने मराठा समाजाचे सदस्य उपस्थित होते.

# ओमराज पौळचे नीट परीक्षेत घवघवीत यश



गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील सुशी येथील ओमराज धर्मराज पौळ याने नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून ६८६ गुण घेत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल पंचायत समिती सदस्य परमेश्वर खरात, सहशिक्षक चंद्रकांत पौळ, विठ्ठल महाराज पौळ, सुशी से.स.सोयायटीचे चेअरमन चंद्रकांत पौळ, सोमा सुरासे यांनी सत्कार करुन अभिनंदन केले. गेवराई

पान ३ वर

# बीडचा विजयोत्सव करताना ज्योतीताई मेटेंचा त्याग विसरता येणार नाही -ज्ञानेश्वर चौधरी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत विजयोत्सव साजरा करताना बीड जिल्ह्याच्या राजकारणात समाजाप्रती त्याग अन् ? समर्पणासाठी ज्या माऊलीचे नाव घेतले जाते त्या म्हणजे लोकनेते स्व.विनायक मेटे साहेब यांच्या सुविद्य पत्नी डॉ.ज्योतिताई विनायक मेटे यांचा सिंहाचा वाटा असल्याचे प्रतिपादन शिवसंग्राम चे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले आहे. सुपर क्लासवन असलेल्या उच्चपदस्थ नोकरीतुन स्वेच्छा निवृत्ती घेतल्यानंतर बहूजन नायक लोकनेते स्व.विनायक मेटे साहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी व त्यांनी जतन केलेला वसा आणि वारसा,



समाजाप्रती तळमळ तसेच समाजहितासाठी अत्यंत कमी काळात अल्पवधीत इच्छा, जिद्द, कष्ट,संयम आणि समर्पण असा बहुअय्यामी वृत्तीच्या बळावर डॉ ज्योतिताई विनायक मेटे यांनी राजकारणात व समाजकारणात आपला वेगळा ठसा उमटविला. सत्ता असो की नसो, जनतेशी, समाजाशी, मातीशी असलेली बांधिलकी ते अतिशय चोखपणे जपत आहेत,

नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत समाजहितासाठी बीडमधून एकच मराठा उमेदवार असावा अशी समाजाची भावना होती. समाजभावनेचा आणि लोकआग्रहाचा आदर करून ज्योतीताईंनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे मतांचे विभाजन टळले आणि हा सोनेरी दिवस पहाण्याचा सुवर्णयोग जिल्हा वासीयांच्या नशिबी आला. म्हणून या तर माऊलीच्या मनाचा मोठेपणा आणि त्याग नजरे आड करता येणार नाही डॉ. ज्योतीताईंनी मनाचा

पान ३ वर

# सोशल मीडियावर फेक अकाऊंट बनवून आक्षेपार्ह पोस्ट

## चार दिवसात दुसरा गुन्हा दाखल

परळी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार ) गटाचे नेते वाल्मिक आण्णा कराड यांचे बनावट ईन्स्टाग्राम अकाउंट तयार करून त्या बनावट ईन्स्टाग्राम खात्यावरून मनोज जरांगे-पाटील यांच्याविषयी आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार परळी नगर परिषदेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) गटनेते वाल्मीक आण्णा कराड यांच्या नावाने कोणीतरी अज्ञात व्यक्तीने बनावट ईन्स्टाग्राम आयडी तयार केला आहे. त्यावरुन मनोज जरांगे पाटील यांचा फोटो असलेल्या पोस्टवर भावपुर्ण श्रध्दांजली अशा प्रकारची प्रक्षोभक पोस्ट सोशल मिडीयावर प्रसारीत केली. त्यामुळे दोन समाजामध्ये शत्रुत्वाची, द्वोषाची भावना निर्माण करुन त्यांची बदनामी होण्याच्या उद्देशाने बनावट सोशल मिडीया अकाऊंट तयार करुन सामाजिक सलोखा

पान ३ वर

# ५० वर्षानंतर इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील जिल्हा परिषद प्राशालेच्या १९७४ साली दहावी उत्तीर्ण झालेल्या मित्र मैत्रिणींनी ५० वर्ष परिपूर्णता सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम सोमवारी (दि. १०) दिंद्रुड येथील अक्षरा मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. या स्नेह मेळाव्यास राज्य भरातून ज्येष्ठ नागरिकांनी उपस्थिती लावली.

या कार्यक्रमास १९७४ चे तत्कालीन सहशिक्षक रामचंद्र अंदुरे, प्रभाकर माले, गंगाधर थळकरी, जनार्धन वायाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवात दीप प्रज्वलन,श्री सरस्वती मातेचे प्रतिमा पूजन, निधन झालेल्या शिक्षक व वर्गमित्रांना श्रध्दांजली अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमास चाळीसहून अधिक ज्येष्ठ नागरीकांनी उपस्थीती दर्शविली.

उपस्थित वर्ग मित्रांनी गेल्या पन्नास वर्षात




जीवनात घडलेल्या विविध घडामोडींवर अवलोकन केले. आपल्या मनोगतात विविध बाबी मांडत असताना उतार वयात सर्वजण एकत्र आल्याचा आनंद व्यक्त केला. पन्नास वर्षानंतर ज्या शिक्षकांनी या वर्गमित्रांना घडवले त्या शिक्षकांचे सर्वांनी आभार व्यक्त करत निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयकुमार देशमुख यांनी केले. प्रस्ताविक श्रीराम काळे, आभार शंकर आरणकल्ले यांनी मानले. सुग्रास भोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. पन्नास वर्षापासून विखुरलेल्या मित्र-मैत्रिणींना एकत्रित करण्यासाठी व हा कार्यक्रम संपन्न होण्यासाठी विजयकुमार देशमुख, श्रीराम काळे, एकनाथ गोरे, वामन शिंदे यांनी गेल्या तीन वर्षांपासून नियोजन केले होते.

# ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ हरिनाम सप्ताहाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

सद्गुरू श्री. संत वै. ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या चोवीसाव्या पुण्यस्मरणार्थ अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन श्री क्षेत्र चाकरवाडी ता. जि. बीड येथे अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्रीराम ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन शांतिब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज (तात्या) चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि.१४ जून २०२४ ते शुक्रवार दि. २१ जून २०२४ शुक्रवार या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आला असून या अखंड हरिनाम सप्ताहाचा व ज्ञानयज्ञ सोहळ्याचा भाविक भक्तांनी लाभ



घ्यावा असे आवाहन श्री. ह.भ.प महादेव महाराज यांनी केले आहे.

सद्गुरू श्री. संत वै. ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या चोवीसाव्या पुण्यस्मरणार्थ अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन शुक्रवार दिनांक १४ जून २०२४ पासून

पान ३ वर

# शालेय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा संपन्न

## दिंद्रुडच्या व्यंकटेश पब्लिक स्कूलचा अभिनव उपक्रम



दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील व्यंकटेश पब्लिक स्कूलच्या वतीने इयत्ता पाचवी ते नववी या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन रविवारी (दि.९) रोजी करण्यात आले होते. ४०० विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदवला.

उन्हाळयात विद्यार्थी अभ्यासापेक्षा मोबाईल मध्ये जास्त व्यस्त असतात. त्यामुळे शालेय शिक्षणापासून विद्यार्थ्यांनी दूर जाऊ नये या उद्देशाने दिंद्रुड येथील व्यंकटेश पब्लिक स्कूलच्या वतीने इयत्ता पाचवी ते नववी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन रविवारी सकाळी करण्यात आले होते. दिंद्रुड व परिसरातील ४२१ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदवला. इंग्रजी गणित विज्ञान व सामान्य ज्ञान या विषयावर ८० गुणांची ही परीक्षा घेण्यात आली. उपस्थित विद्यार्थ्यांचे चॉकलेट व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शांततेत पार पडलेल्या या परीक्षेचे नियोजन अध्यक्ष प्रदीप ठोंबरे, स्वाती ठोंबरे, मुख्याध्यापक भीमराव मस्के, शेख इरफान, लखन नाईकवाडे, राहुल धुमाळ, नितीन ठोंबरे यांच्यासह शिक्षकांनी केले होते.परीक्षेत बसलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी निवारा व चहापाणी सोय शाळेच्या वतीने करण्यात आली होती.

सोळंके शिवम राजेंद्र,सोळंके यशश्री योगेश, फपाळ तुषार दत्ता, जोशी माहेश्वरी नंदकिशोर, यादव अंकित गजानन या विद्यार्थ्यांसह वीस विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सर्वोत्तम गुण घेत शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरल्याची माहिती मुख्याध्यापक भीमराव मस्के यांनी दिली.

# सुरेश कुटे बाहेर राहिले तरच पैसे मिळतील एसपींना भेटलेल्या ठेवीदार महिलांची विनंती

बीड । प्रतिनिधी

ज्ञानराजाचे चेअरमन सुरेश कुटे पोलीस कोठडीत न राहता बाहेर राहिले तरच लोकांचे पैसे मिळतील गोरगरीब ठेवीदारांचे पैसे मिळणे अत्यंत गरजेचे आहे .आणि हे मिळण्यासाठी कुटे यांना बाहेर ठेवणे गरजेचे आहे अशी विनंती महिला ठेवीदारांनी पोलीस अधीक्षक



नंदकुमार ठाकूर यांच्याकडे केली त्यानंतर त्या प्रसारमाध्यमांशी बोलल्या हे त्यांचे म्हणणे काही प्रमाणात खरे असून कुटे बाहेर राहिले तरच लोकांचे पैसे मिळणे सोपे जाईल . गोरगरिबांचे पैसे मिळणे गरजेचे असल्याचे अनेकांनी मत व्यक्त केले. एवढे दिवस थांबल्यानंतर आणखी दोन-चार दिवस ठेवीदारांनी संयम ठेवावा त्याचा फायदाच होईल असे मतही काही ठेवीदार आणि व्यक्त केले.

गेल्या काही दिवसापासून ज्ञानराजा मल्टीस्टेट बँकेच्या ठेवीदारांनी पैसे काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तिरूमला ग्रुप वर तपासणी पथकाने भेट दिल्यानंतर सगळीकडे अफवा पसरून ज्ञानराधाच्या सर्व शाखांमध्ये ठेवीदारांनी एकच गर्दी केली. यामुळे एकाचवेळी पैसे देणे शक्य नसल्याने शाखा बंद कराव्या लागल्या .हे पैसे परत करण्यासाठी सुरेश कुटे गेल्या अनेक दिवसापासून प्रयत्न करीत आहेत. गोरगरिबांच्या पैशाने ठेवणार नाही. हे ते वारंवार सांगत आहेत. काही दिवस ठेवीदारांनी त्यांच्यावर विश्वासही ठेवला मात्र जस जसा उशीर होत गेला तसतसे लोकांनी गुन्हे दाखल करायला सुरुवात केली. काही गुन्ह्यांमध्ये माघारी घेण्यात आली. मात्र आता लोकांचाही संयम सुटल्याने लोक आता सुरेश कुटे यांच्यावर गुन्हे दाखल करायला पुढे सरसावले. कुटे काही दिवसापासून तांत्रिक अडचणी सांगतात. मात्र त्यालाही विलंब लागत आहे. काल-परवा त्यांनी दोन दिवसानंतर पैसे मिळतील असे सांगितले. मात्र तांत्रिक अडचणी वाढतच गेल्या त्यामुळे ठेवीदारांनी ही किती दिवस विश्वास ठेवायचा हाही प्रश्न आहे. त्यामुळे ठेवीदार आक्रमक झाले असून प्रत्येकाला आपले पैसे परत मिळावेत याची धास्ती आहे. गोरगरिबांच्या अनेक कामे पैसे न मिळाल्यामुळे रखडले आहेत .मात्र हे पैसे मिळण्यासाठी सुरेश कुटे हे बाहेर राहणे गरजेचे आहे असे स्पष्ट मत महिला ठेवीदारांनी पोलीस अधीक्षकांना आणि प्रसारमाध्यमांनाही बोलताना व्यक्त केले यात बऱ्यापैकी तथ्य आहे. सुरेश कुटे बाहेर राहिले तर काही ना काही प्रयत्न करत राहतील आणि पैसे मिळण्यास मदत होईल. मात्र पोलीस चौकशीत गेल्यानंतर पोलिसांनाही त्यांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागेल आणि ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्व शाखांना कागदपत्रासह ताब्यात घ्यावे लागेल आणि ही प्रक्रिया वर्षभर पुढे चालू राहील तिथून पुढे बँकेचे कर्जदार आहेत त्यांच्या मालमत्ता जप्त करण्यास आणखी काही दिवस लागतील. या प्रक्रियेमध्ये सर्वसामान्य माणूस भरडला जाऊन अनेकांवर उपासमारीची वेळ येणार आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी सुरेश कुटे बाहेर राहणे गरजेचे आहे. तरच ते लोकांसाठी प्रयत्न करतील असे अनेकांनी आपले मत व्यक्त केले.

### दोन दिवसात बँकेकडे पैसे येणार

गेल्या काही दिवसापासून सुरेश कुठे पैसे देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. तिरूमला या कंपनीकडून काही युनिट भागीदारीत दिल्याचेही सांगण्यात येते .या पैशातून आपण ठेवीदाराचे पूर्ण पैसे देऊ शकतो असा विश्वास सुरेश कुटे यांना असून येत्या दोन दिवसात ही प्रक्रिया पूर्ण होईल. अशी माहिती विश्वासनीय सूत्रांनी माध्यमांना दिली.

### अटके नंतरची प्रक्रिया किचकट

अटके नंतरची प्रक्रिया किचकट असुन सुरेश कुटे यांना प्रत्येक ठिकाणी जेथे गुन्हा दाखल झाला. तेथील स्थानिक पोलिस ताब्यात घेत राहिले आणि चौकशी सुरू झाली तर ही प्रक्रिया अनेक दिवस चालेल. त्यानंतर बँकेच्या सर्व शाखांना सिल करून तेथील कागदपत्राची तपासणी होईल .त्यानंतर या बँकेचे जे कर्जदार आहेत त्यांची मालमत्ता ताब्यात घेण्याची प्रक्रिया होईल. आणी त्यानंतर या मालमत्तेचा लिलाव होईल .आणि ही प्रक्रिया किचकट आहे .असे सहकारातील जाणकारांचे मत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार दि.११ जून २०२४ । पान ७

# राज्यातील पाऊस, खते, बी-बियाणे, टँकर, पीक कर्ज, पाणीसाठ्याचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांकडून घेतला आढावा

**शेतकऱ्यांना आवश्यक प्रमाणात खते, बियाणे उपलब्ध करून देण्यासह बोगस बियाणे विक्रेत्यांवर कडक कारवाई करा - उपमुख्यमंत्री अजित पवार**

## प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याबाबत दक्षता घ्या- उपमुख्यमंत्री

**मुबंई । प्रतिनिधी**

राज्यात पुणे विभागासह कोकण प्रदेशात चांगला पाऊस झाला आहे, तर अन्य भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात समाधानकारक पाऊस अपेक्षित आहे. पावसाच्या आगमनानंतर शेतकरी खरीप पिकांच्या पेरणीच्या तयारीला लागला आहे. त्यामुळे खते-बियाण्यांच्या अभावी कुठेही पेरण्यांना विलंब होता कामा नये. त्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक प्रमाणात बियाणे, खतांचा पुरवठा करा. तसेच प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याची दक्षता घ्या, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांना दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या मंत्रालयीन दालनात आज राज्यातील पाऊसमान, खते, बी-बियाणे पुरवठा, पीक कर्ज वितरण, टँकरची स्थिती, धरणांतील पाणीसाठा व विसर्गाचे नियोजन, पूर नियंत्रण, चारा उपलब्धता याबाबत दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून आढावा घेतला. बैठकीला महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, आपत्ती व्यवस्थापनचे संचालक लहूराज माळी, कृषी विभागाचे उपसचिव श्री. चांदवले आदी उपस्थित होते. तसेच पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, अमरावती विभागीय आयुक्त निधी पांडे, नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी प्रसन्ना-बिदरी, छत्रपती संभाजीनगर विभागाचे उपायुक्त जगदीश



मनियार, नाशिक विभागाच्या उपायुक्त राणी ताटे, कोकण विभागाचे उपायुक्त संजीव पलांडे, कृषी सहसंचालक रावसाहेब भाबडे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आपल्या विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पहिल्याच पावसात पुणे शहरातील विविध भागात पाणी साचल्याचे दिसून आले. महापालिकेने याबाबत त्वरित आवश्यक उपाययोजना कराव्यात. मोठ्या पावसात पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात यावे. राज्यात काही भागात १०० मिलिमीटर किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस पडला आहे. अशा परिस्थितीत वापसा आल्यानंतरच पेरण्यांचे नियोजन करावे. तसेच पुरेसा पाऊस पडला नसलेल्या ठिकाणी चांगला पाऊस पडल्यानंतरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी, यासाठी कृषी विभागाच्या समन्वयाने जनजागृती करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पाऊस सरासरीपेक्षा जास्त पडणार असल्यामुळे धरणांमधील पाणी सोडण्याचे काटेकोर नियोजन करावे. आंतरराज्यीय धरणांवर जलसंपदा विभागाने आपला समन्वय अधिकारी नियुक्त करावा, त्याच्या माध्यमातून योग्य वेळी पाण्याच्या विसर्गाबाबत नियोजन करावे. पाण्याचा फुगवटा निर्माण होऊन शहरे, गावांत पाणी येणार नाही याची काळजी घ्यावी. आलमट्टी धरणाच्या पाण्यामुळे कोल्हापूर शहरात पुराची समस्या येऊ नये, यासाठी आतापासून नियोजन करावे. तसेच मेडिगट्टा, गोसीखुर्द धरणाबाबतही सतर्क राहून गडचिरोली जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण होणार नाही, याबाबत काळजी घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

पाऊसमान चांगले असल्यामुळे पाणी तुंबणे, अनियंत्रित विसर्गामुळे पूर येणे आदींबाबत यंत्रणांनी काळजी घ्यावी. पूरस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पूर्वसूचना देऊन सतर्क करावे. अशा परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्याचा, वेळेवर मदत व पुनर्वसनाचे सर्व उपाय योजण्याचा प्रयत्न करावा. जलसंपदा विभागाने धरणांमधील पाणी सोडण्याबाबत योग्य ते नियोजन करावे. याबाबत अन्य यंत्रणांशी समन्वय ठेवावा. शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेवर उपलब्ध होईल याबाबत बँकांना सूचना द्याव्यात, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

विभागीय आयुक्तांनी आपआपल्या विभागातील पाऊस, धरणातील जलसाठा, खरीप हंगामाचे नियोजन, तर पुणे विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी यासोबतच आषाढी वारीच्या नियोजनाबबात माहिती दिली. आषाढी वारीसाठी मंजूर निधी ताबडतोब वितरित करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिले.

# कर्करोगग्रस्त १८३ रुग्णांना 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टतर्फे मोफत औषधोपचार

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळासह बीव्हीजी लाईफ सायन्सेसचा पुढाकार**

**पुणे । प्रतिनिधी**

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगिकारुन कार्यरत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे कर्करोगग्रस्त १८३ रुग्णांना मोफत औषधोपचार देण्यात आले. स्तन, गर्भाशय, फुफ्फुस,लिव्हर, ब्रेन ट्युमर, तोंडाचा, प्रोटेस्ट, रक्ताचा कर्करोग याविषयी पुर्नतपासणी करुन आयुर्वेदिक औषधोपचार देत दैनंदिन जीवनशैली कशी असावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत बीव्हीजी लाईफ सायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने सदाशिव पेठेतील उद्यान प्रसाद कार्यालयात मोफत कर्करोग तपासणी व औषधोपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सद्गुरु ग्रुपचे यशवंत कुलकर्णी, ट्रस्टचे उपाध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस



हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग सहकारी बँकेचे संचालक सुनील जाधव, राजेंद्र पायमोडे, राहुल चव्हाण, बीव्हीजी लाईफ सायन्सेसच्या डॉ.अर्चना शिंदे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी, सचिन आखाडे, विशाल केदारी, अमोल चव्हाण, अंकुश रासने, तुषार रायकर, राजाभाऊ घोडके, सुभाष सूर्यवंशी आदी उपस्थित होते. डॉ. गौरव पाठारे, डॉ. मानसी माळवणकर, सुधाकर गर्डी यांनी शिबीराकरिता सहाय्य केले. शिबीरात २३ प्रकारच्या रक्ततपासण्या करण्यात आल्या.

डॉ. अर्चना शिंदे म्हणाल्या, कर्करोग हे जगभरातील मृत्यूंचे कारण आहे. सन २०२० मध्ये सुमारे १० दशलक्ष मृत्यु किंवा सहा मृत्युंपैकी एक मृत्यू हा कर्करोगामुळे झाला आहे. अशा रुग्णांकरिता बीव्हीजी लाईफ सायन्सेसने एक औषध तयार केले असून त्याचे मोफत वाटप या शिबीरात करण्यात येत आहे. तसेच आपण दैनंदिन कशी काळजी घ्यावी, याचे मार्गदर्शन देखील आम्ही करीत आहोत.

महेश सूर्यवंशी म्हणाले, बीव्हीजी ग्रुपचे अध्यक्ष हणमंतराव गायकवाड यांच्या सहकार्याने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. पुढील टप्प्यात बीव्हीजी च्या सहकार्याने पुढील औषधोपचार देखील करण्यात येईल. ट्रस्ट जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत पुणे आणि परिसरातील तब्बल १८५ रुग्णालयांसोबत संलग्नपणे काम करीत आहे. रुग्णांना मोफत औषधे व शस्त्रक्रिया करुन देण्याचा प्रयत्न ट्रस्टतर्फे केला जातो. मागील वर्षी ४१ हजार रुग्णांनी याचा लाभ घेतला आहे. दर महिन्यातून एकदा असे मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येत असून गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा. याकरिता ट्रस्टच्या गणपती भवन कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

# भीमा नदीवरील पुलाचा पिलर कोसळला

**पुणे । प्रतिनिधी**

दौंड येथील भीमा नदीवरील दौंड-गार या गावांना जोडणाऱ्या पुलाचे बांधकाम सुरू असताना पुलाचा एक पिलर काल (रविवार) रात्री कोसळला. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या पुलाचे काम सुरू आहे. उन्हाळ्यात भीमा नदी पूर्ण कोरडी होती, परंतु गेल्या तीन-चार दिवसांपासून पाऊस सुरू झाला आहे. यामुळे धरणातून देखील थोडेफार पाणी नदीला सोडण्यात आले आहे.

रविवारी दि ९ रात्री मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. त्यामुळे या कामावरील पिलरचा एक भाग कोसळला. त्यामुळे हे निकृष्ट दर्जाचे काम आहे हे यावरून सिद्ध होते, जर काम सुरू असते तर आणि हा असा प्रकार घडला असता तर नक्कीच कोणाला तरी आपला जीव गमवावा लागला असता. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे चौकशी केली असता, या विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की हा पडला नसून याचा काही भाग वाकडा झाला होता. त्यामुळे आम्ही तो काढायला सांगितला असे म्हणून आपली चूक झाकणाच्या प्रयत्न बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे.

जर पिलरचा हा भाग वाकडा झाला असता तर संबंधित ठेकेदाराला या पुलावर देखरेख करणाऱ्या इंजिनियर व अधिकाऱ्यांनी त्याच वेळेस सूचना दिली असती. परंतु त्यावेळेस सूचना का दिली नाही हा प्रश्न अनुत्तरीत आहे. एकंदरीतच आजूबाजूच्या लोकांच्या म्हणण्याप्रमाणे हा भाग हा कोसळला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या कामाची चौकशी होणे देखील गरजेचे आहे. तसेच दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे. दौंड सार्वजनिक बांधकाम विभागात अधिकारी एवढे मुजोर झाले आहेत की कोणतीही माहिती स्पष्टपणे देत नाहीत. त्यामुळे या कामावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# पाणी साचून नागरिकांना असुविधेला सामोरे जावे लागू नये यासाठी उपाययोजना करा- जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर तसेच जिल्ह्यातील नगरपरिषदांच्या हद्दीत मोठ्या पावसामुळे पाणी साचण्याची स्थिती पाहता नालेसफाई, गटारे स्वच्छता, नदी, नाल्यांच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे काढणे याला प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आपत्तीव्यवस्थापनाच्या अनुषंगाने बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते.

गेल्या काही दिवसात पुणे शहर तसेच बारामती, दौंड, इंदापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असून त्यामुळे रस्त्यांवर पाणी साचून नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर पाणी साचू नये म्हणून सर्व संबंधित यंत्रणांनी सूक्ष्म पातळीवर नियोजन करावे. कठोर कारवाईसाठी पोलीस संरक्षणात एक्सकॅव्हेटर आदी यंत्रे वापरुन नाले, नद्यांच्या कडेची अतिक्रमणे काढावीत.

जाहिरात फलकांमुळे वारंवार दुर्घटना घडत असून अनधिकृत तसेच धोकादायक होर्डिंग्ज पाडण्याची कार्यवाही गतीने करावी. शासकीय यंत्रणा तसेच खासगी कंत्राटदारांकडून रस्ते तसेच अन्य बांधकामे सुरू असलेल्या ठिकाणी रस्त्यांवर दुर्घटना घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

यावेळी बैठकीस सहायक जिल्हाधिकारी डॉ. पूजा मनोरमा दिलीप खेडकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, महानगरपालिका, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी यांच्यासह भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, आरोग्य विभाग, पोलीस, अग्निशमन विभाग, पशुसंवर्धन विभाग, प्रदुषण नियंत्रण मंडळ, अन्न व औषध प्रशासन, महावितरण, परिवहन विभाग, राज्य मार्ग परिवहन महामंडळ आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी डॉ. रोहिणी गवाणकर यांनी वयाच्या ९६ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**पुणे । प्रतिनिधी**

स्त्री-अभ्यास व्यासपीठाच्या संस्थापक, संशोधक, लेखिका डॉ. रोहिणी गवाणकर यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी शुक्रवार दि. ७ मे रोजी संध्याकाळी ७.३० वाजता पुणे येथील त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी आपला देह मेडिकल कॉलेजला दान केला.

एक निष्ठावान कार्यकर्ती

स्वातंत्रसेनानी असलेल्या रोहिणीताई यांचे व्यक्तिमत्व विविधांगी होते. त्या आपल्या देशातल्या स्त्रीमुक्ती चळवळीतल्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या तर शैक्षणिकदृष्ट्या प्रतिभासंपन्न होत्या. डछऊढ महिला विद्यापीठातील निवृत्त डीन ऑफ सोशल सायन्सेस व राज्यशास्त्र विभाग प्रमुख होत्या. लग्नानंतर त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. १९८२ साली एसएनडीटी विद्यापीठातून स्त्री अभ्यासात डॉक्टरेट प्राप्त करणाऱ्या त्या पहिल्या संशोधक ठरल्या! देशभक्तीच्या विचाराने कार्यरत असलेल्या राष्ट्रीय पातळीवरील अनेक चळवळींमधले लढवय्ये नेतृत्व अशा अनेक भूमिका निभावलेले व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. रोहिणीताई गवाणकर. त्या कृतिशील विचारवंत होत्या. या कृतिशील विचारवंताची वैचारिक मूस घडली ती स्वातंत्रलढ्याच्या काळात. रोहिणीताईंना पुरोगामी वारसा त्यांच्या आई कडूनच मिळाला. स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळीने भारलेल्या दिवसांमध्ये सेवादलातल्या दिग्गजाचे संस्कार रोहिणीताईवर रुजले होते. त्याच्या जोरावर त्यांनी अनेक संस्थांची उभारणी केली. ग्रामीण भागातल्या महिलाना पंचायत स्तरावर स्थान मिळावे म्हणून त्या प्रयत्नशील राहिल्या. कामाच्या ठिकाणी होणारे अत्याचार यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या विशाखा समितीचा ढाचा त्याच्या मार्गदर्शनाखाली आखण्यात आला. महाराष्ट्र स्त्री अभ्यास व्यासपीठ, मुंबई च्या त्या पहिल्या संस्थापक अध्यक्ष ठरल्या. मंडळात त्यानी विविध पदावर १२ वर्षे काम पाहिले. ग्रामीण भागातल्या महिलाना पंचायत स्तरावर स्थान मिळावे म्हणून त्या प्रयत्नशील राहिल्या. त्याअंतर्गत जवळपास पाच हजार महिला सरपंचांना विविध संस्थांमार्फत त्यांनी प्रबोधन केले. कॅप्टन लक्ष्मी, पाणीवाली बाई, राजकारणातल्या महिला, मराठी स्त्रीशक्ती, आझाद हिंद सेना, स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचे योगदान, ग्रामीण स्त्रीनेतृत्व, मणीभवनच्या आठवणी, पंचायत समितीतल्या महिला सदस्यांना मार्गदर्शन अशा एक ना अनेक विषयांवर त्याची अभ्यासपूर्ण पुस्तके आहेत. बरोबरीने तितक्याच पुस्तिकाही आहेत. ह्याच पुस्तकांच्या माहितीवर 'अभिव्यक्ती'ने तीन वर्षापूर्वी 'स्वातंत्रलढ्यातील महिला' या विषयावरील १०० पोस्टर्सचे एक प्रदर्शन तयार केले आहे. आज ह्या वयातही त्यांची लेखणी आणि स्मरणशक्ती चालू होती. गेल्या वर्षी २ ऑक्टोबरला त्यांच्या 'असे नेते असे अनुयायी' हे पुस्तक लोकायतने छापून प्रकाशित केले. अतिशय साधी, शाश्वत जीवनमूल्यांना चिकटून असलेली जीवनशैली त्यानी कायम जोपासली आहे. मनाने संवेदनशील, हळव्या माणूसपण जपणाऱ्या, श्रेय न घेणाऱ्या निष्ठेने कार्य करणाऱ्या विदुषी डॉ. रोहिणीताई गवाणकर अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरतील. माणूस म्हणून जगायचा ध्यास घेतलेल्या रोहिणीताईंनी ७ मे रोजी आपल्या जीवनाला पूर्णविराम दिला.

# डासांची उत्पत्ती रोखुया, हिवतापाचे निर्मुलन करूया

**पुणे । प्रतिनिधी**

दरवर्षी जून महिना हा 'हिवताप प्रतिबंध महिना' म्हणून पाळला जातो. किटकजन्य आजारांमुळे दरवर्षी अनेकांना जीव गमवावा लागतो. हिवताप, डेंग्यू, चिकनगुन्या, हत्तीरोगसारखे आजार डास चावल्यामुळे होतात. असे जीवघेणे आजारांपासून दूर राहण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात, घरात डासांची निर्मिती होवू नये म्हणून विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

किटकजन्य आजारांचा प्रसार करणाऱ्या डासांची उत्पत्ती साचलेल्या पाण्यात होत असते. डास हा साचलेल्या पाण्यात अंडी घालतो. ८ ते १० दिवसात नवीन डास जन्माला येतो. हा डास आजारी व्यक्तीला (रुग्णास) चावल्यास रुग्णाच्या शरीरातील जंतू डासाच्या शरीरात जातात. तेथे त्यांची वाढ होते व त्यानंतर हा असा दूषित डास ज्या निरोगी व्यक्तींना चावेल त्यांना डेंग्यू, चिकनगुन्या व हत्तीरोग यासारखे आजार होतात.

हिवतापाची लक्षणे:

थंडी वाजून ताप येणे हे हिवतापाचे लक्षण आहे. ताप हा सततचा असू शकतो किंवा एक दिवसाआड येऊ शकतो. नंतर घाम येवून अंग गार पडते. ताप आल्यानंतर डोके दुखते व बऱ्याच वेळा उलट्याही होतात.

डास आणि त्यांच्या उत्पत्तींची ठिकाणे:

नॉफिलीस डास हा हिवतापाचा प्रसार करतो. त्याची उत्पत्ती नदी, नाले, विहिरी व तळी याठिकाणच्या स्वच्छ पाणीसाठ्यांमध्ये होते. एडिस एजिप्ती हा डास डेंग्यू आणि चिकनगुन्या या आजारांचा प्रसार करतो. त्याची उत्पत्ती ही घरगुती पाण्याच्या टाक्या, बॅरल, रांजण, हौद, फुटके डबे, निरूपयोगी साठविलेले पाणी, घरातील कुलर, फ्रिजच्या डीप ट्रे मधील पाणी, मनी प्लॅन्ट मधील पाणी इत्यादी स्वच्छ पाण्यासाठ्यामध्ये होते. क्यूलेक्स डास हा हत्तीरोगाचा प्रसार करतो. त्याची उत्पत्ती शौचालयाचा सेप्टिक टँक, तुंबलेली गटारे व पाण्याची डबके या अस्वच्छ पाणीसाठ्यात होते.

अशी घ्यावी दक्षता:

ताप आल्यास त्वरीत डॉक्टरकडे जावे. डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणे आवश्यक चाचण्या कराव्यात. शासकीय रुग्णालयात यासाठी मोफत औषधोपचार उपलब्ध आहेत. झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा. पूर्ण अंग झाकले जाईल असे कपडे वापरावेत. डासांपासून संरक्षणासाठी घराच्या दारे, खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात. क्रीम, मॅट, कॉईलचा वापर करावा.

डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी करा उपाययोजना:

घराच्या शौचालयाच्या सेप्टीक टँकच्या व्हेन्ट पाईपला (गॅस पाईप) जाळी बसवावी अथवा कापड बांधावे यामुळे डासांची उत्पत्ती रोखली जाते. घर आणि परिसरात स्वच्छता ठेवावी. सेप्टीक टँकचे ढापे सिलबंध ठेवावेत. गच्चीवरील पाण्याच्या टाक्यांना घट्ट झाकण बसवावीत. घरातील पाण्याच्या टाक्या, रांजण, बॅरल, हौद हे आठवड्यातून किमान एकदा घासून पुसून स्वच्छ करावेत व ते घट्ट झाकनाने आणि कापडाने नेहमी झाकून ठेवावेत. घरातील, गच्चीवरील, घराच्या परिसरातील भंगार सामान, फुटके डबे, वस्तू, निरूपयोगी टायर यांची विल्हेवाट लावावी. या ठिकाणी पावसाचे पाणी साठून डासांची उत्पत्ती होते. घरातील कुलर, मनी प्लॉट, चायनीज प्लॉटमधील पाणी आठवड्यातून किमान एकदा बदलून स्वच्छ करून पुन्हा भरावे. फ्रीजच्या ट्रेमधील पाणी वेळोवेळी काढून टाकावे. गच्चीवर अंगणात घराच्या परिसरात कोठेही पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. अपर्णा पाटील, जिल्हा हिवताप अधिकारी, पुणे- सन २०२७ पर्यंत हिवताप निर्मुलन व शून्य हिवताप रुग्ण हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हिवताप निर्मूलन कार्यक्रम नागरिकांच्या सहभागाने राबविण्यात येणार आहे. हिवताप प्रतिबंध महिना राबवित असताना नागरिकांना हिवताप प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे महत्व पटवून देण्यात येणार आहे. 'डासांची उत्पत्ती रोखूया, हिवतापाचे निर्मूलन करूया' हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात आणण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानात सक्रीय सहभाग नोंदवावा.

# पिंपरी चिंचवड शहर मध्यवर्ती कार्यालय येथे राष्ट्रवादी काँग्रेसचा २५ वा वर्धापनदिन साजरा

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त पक्षाच्या खराळवाडी, पिंपरी येथील पक्ष कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी १०.१० वा शहराध्यक्ष अजित दामोदर गव्हाणे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमास शहराध्यक्ष अजित दामोदर गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, शहर महिला अध्यक्ष कविता आल्हाट, कार्याध्यक्ष राहुल भोसले, शाम लांडे, फजल शेख, युवक अध्यक्ष शेखर काटे, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, विजय लोखंडे, प्रकाश सोमवंशी, राजेंद्र साळुंखे, सेवादल अध्यक्ष महेश झपके, संजय औसरमल, अकबर मुल्ला, राजू लोखंडे, संजय उदावंत, प्रदिप तापकिर, देविदास गोफणे, कविता खराडे, सचिन औटे, विनोद वरखडे, किरण देशमुख, श्रीकांत कदम, ज्ञानेश्वर कांबळे, प्रदिप औटी तुकाराम बजबळकर, राजेंद्रसिंग वालिया, प्रदीप गायकवाड,गारोबा गुजर, अविनाश शेरेकर, शाम जगताप, सचिन वाल्हेकर, पोपट पडवळ, युवराज पवार, आशा म्हस्के, कुमार कांबळे, बाबासाहेब चौधरी, स्वप्नील चव्हाण, निखिल घाडगे, विजय घोडके, गणेश गायकवाड, रविंद्र सोनवणे, किंचक सरवदे, सागर बोराटे, बाळासाहेब भोसले, अक्षय कांबळे, बापू सोनवणे, मनिष शेडगे,अंकुश बिरादार, धनाजी तांबे, सुनिल अडागळे इत्यांदीसह अनेक पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन सेवादल अध्यक्ष महेश झपके यांनी केले.

cmyk